cmyk

## संपादकीय

### सामान्यांच्या आयुष्याला उष्णता आणि महागाईचा विळखा !

देशात सध्या दोन आघाड्यांवर सामान्य माणूस अक्षरश: होरपळून निघत आहे. एकीकडे विक्रमी उष्णतेच्या लाटा आणि दुसरीकडे महागाईचा भडका! उन्हाच्या झळा शरीराला भाजत आहेत, तर वाढत्या दरांचा तडाखा थेट खिशाला बसत आहे. या दुहेरी संकटाच्या छायेत देशातील सर्वसामान्य नागरिकांचे जगणे अधिक कठीण बनत चालले असताना सत्ताधारी मात्र राजकीय उत्सवांच्या जल्लोषात मग्न असल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे जनतेच्या मनात अस्वस्थता आणि नाराजी वाढत असल्याचे स्पष्ट जाणवते.


दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–६९ | शुक्रवार दि.२९ मे २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### ऊस तोडणी कामगारांच्या मुलींसाठी बालगृह–तटकरे

मुंबईः ऊसतोडीसाठी स्थलांतरित होणाऱ्या कुटुंबांतील मुलींच्या बालविवाहाचे वाढते प्रमाण रोखण्यासाठी राज्य शासन महत्वपूर्ण पाऊल उचलणार आहे. ऊस तोडणीसाठी जाणाऱ्या कुटुंबांतील मुलींना चार महिन्यांच्या कालावधीसाठी बालगृहात ठेवण्याचा निर्णय घेण्यात येणार असल्याची माहिती मंत्री तटकरे यांनी दिली. महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी मंत्रालयात एकात्मिक बाल विकास सेवा योजना तसेच राज्य महिला आयोगाच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी महिला व बाल विकास विभागाचे सचिव अनुप कुमार यादव, आयुक्त जगदीश मिनियार हे दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते. तसेच विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### नव्या सरन्यायाधीशांसाठी पाच नावांची शिफारस

नवी दिल्लीः सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमने सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश नियुक्त करण्यासाठी पाच नावांची शिफारस केंद्र सरकारकडे पाठवली आहे. यामध्ये चार उच्च न्यायालयांचे मुख्य न्यायाधीश आणि एक वरिष्ठ महिला वकील यांचा समावेश आहे. कॉलेजियमने पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश शील नागू, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश श्री चंद्रशेखर, मध्य प्रदेश उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश संजीव सचदेवा, जम्मू–काश्मीर आणि लडाख उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश अरुण पल्ली आणि वरिष्ठ वकील व्ही मोहना यांची नावे पाठवली आहेत. ही शिफारस २२ आणि २७ मे रोजी झालेल्या कॉलेजियमच्या बैठकांमध्ये करण्यात आली आहे. ज्येष्ठ वकील व्ही. मोहना यांच्या नियुक्तीमुळे सर्वोच्च न्यायालयात महिलांचा सहभाग मजबूत होण्याची अपेक्षा आहे.

### मुस्लिम औरंगजेबाची नव्हे, आपलीच अवलाद–आठवले

मुंबईः भारतातील मुस्लिम हे औरंगजेबाची नव्हे, तर आपलीच अवलाद आहेत, असे वक्तव्य करत धार्मिक भावना न भडकवण्याचे आवाहन केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी पालघर येथे आयोजित पत्रकार परिषदेत केले. मुस्लिम धर्मियांच्या बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर मुंबई आणि परिसरात गेल्या काही दिवसांपासून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. मुंबईतील काही गृहसंकुलांमध्ये आणि सार्वजनिक ठिकाणी बकऱ्या आणण्यास व त्यांची कुर्बानी देण्यास भाजपने तीव्र विरोध दर्शवला होता. या वादामुळे मीरा रोड, घाटकोपर, गोरेगाव यांसारख्या भागांत मोठा तणाव निर्माण झाला होता. या संपूर्ण पार्श्वभूमीवर, केंद्र सरकारमधील मंत्री आणि 'रिपाई'चे प्रमुख ना. रामदास आठवले यांनी आपली प्रतिक्रिया दिली. मुस्लिम समाजाने जर सणासाठी बकऱ्या आणल्या असतील, तर त्याला विरोध करण्याची गरज नाही. मुघल भारतात येण्यापूर्वी येथील मुस्लिम बांधव हे हिंदूच होते. मुघल आल्यानंतर येथील हिंदूचे धर्मांतर झाले. त्यामुळे भारतातील मुस्लिम हे काही औरंगजेबाची अवलाद नाहीत, ते आपलीच (हिंदूंची) अवलाद आहेत, असे ते म्हणाले.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२७ मे २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहूः १७८.५० क्विंटल | २,००० | २,६३१ | २,३६३ |
| ज्वारी/हायब्रिड : २४५.०० क्विंटल | २,००० | ४,५०१ | २,७११ |
| मका/लोकलः ८.५० क्विंटल | १,९४० | १,९४० | १,९४० |
| तूर : १०.५० क्विंटल | ७,४११ | ७,४१७ | ७,४१४ |
| उडीद : -- क्विंटल | -- | -- | -- |
| बाजरीः १६४.५० क्विंटल | २,२०० | २,७०० | २,३९७ |
| मुगः -- क्विंटल | -- | -- | -- |
| सोयाबीनः-- क्विंटल | -- | -- | -- |
| हरभराः ५.०० क्विंटल | ५,००० | ५,७५० | ५,४७२ |

# खरीप हंगामासाठी केंद्र सरकारकडून १७ लाख टन युरिया आयातीची तयारी

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**मध्यपूर्वेत सुरू असलेल्या संघर्षामुळे जागतिक गॅस पुरवठा साखळी विस्कळीत झाली असून त्याचा थेट परिणाम भारतातील युरिया उत्पादनावर झाला आहे. संभाव्य खतटंचाई टाळण्यासाठी केंद्र सरकारने खरीप हंगामासाठी १७ लाख टन युरिया आयातीची तयारी सुरू केली असून त्यासाठी जागतिक निविदा काढण्यात आली आहे.**




सध्याच्या जागतिक संकटाच्या पार्श्वभूमीवर भारताने युरिया आयातीसाठी काढलेली ही दुसरी निविदा आहे. याआधी एप्रिलच्या सुरुवातीला २५ लाख टन नायट्रोजन खत खरेदीसाठी निविदा जारी करण्यात आली होती. सरकारच्या वतीने खते उत्पादन आणि आयात करणाऱ्या नॅशनल फर्टिलायझर्स लिमिटेडने आपल्या संकेतस्थळावर नवीन निविदा नोटीस प्रसिद्ध केली. या निविदेनुसार, देशाच्या पश्चिम किनारपट्टीमार्गे ९ लाख टन युरिया आयात करण्यात येणार आहे, तर उर्वरित साठा पूर्व किनारपट्टीमार्गे आणला जाणार आहे. आयात होणारी युरियाची खेप २० जुलैपर्यंत भारतीय बंदरांमधून रवाना होणे आवश्यक असल्याचे नोटिशीत नमूद करण्यात आले आहे.ङ्गदेशांतर्गत वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी भारताकडून नियमितपणे जागतिक निविदांद्वारे युरियाची खरेदी केली जाते. मात्र, इराण विरुद्ध अमेरिका–इस्रायल संघर्ष तीव्र झाल्यानंतरची ही दुसरी मोठी निविदा असल्याने परिस्थितीची गंभीरता अधोरेखित झाली आहे. भारत हा जगातील सर्वात मोठा युरिया आयातदार देश मानला जातो. देशांतर्गत युरिया उत्पादनासाठी नैसर्गिक गॅस हा अत्यावश्यक कच्चा माल आहे. भारत बहुतांश एलएनजी गॅस मध्यपूर्वेतून

▶▶ पान २ वर

### २०२५–२६ मध्ये खतांची आयात किती?

भारताने २०२५–२६ (एप्रिल–मार्च कालावधी) मध्ये, २८२ लाख टन खते आयात केली. त्यासाठी १४.५ अब्ज डॉलर्सहून अधिक खर्च आला. त्यात ११२ लाख टन युरियाचा समावेश होता. भारताने या वर्षात २९३ लाख टन युरियाचे उत्पादन घेतले आहे. खतांच्या एकूण वापरापैकी युरियाचा वाटा ४५ टक्के आहे. खरीप पीक पेरणीनंतर साधारणपणे जून महिन्याच्या अखेरीस युरियाचा डोस द्यावा लागतो.

# कर्नाटकात राजकीय भूकंप

## मुख्यमंत्री सिद्धरामय्यांचा राजीनामा,डी. के. शिवकुमार नवे मुख्यमंत्री?

बंगळूरू । वृत्तसंस्था

कर्नाटकातील राजकारणात गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेल्या नेतृत्त्व बदलाच्या चर्चांना अखेर पूर्णविराम मिळाला आहे. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी त्यांच्या पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा कर्नाटकच्या राज्यपालांचे विशेष सचिव प्रभू शंकर यांच्याकडे सादर केला. तर सिद्धरामय्यांच्या जागी



उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार हे मुख्यमंत्रीपदाचे प्रबळ दावेदार मानले जात आहेत. काँग्रेस पक्षश्रेष्ठींनी शिवकुमार यांच्या नावालाच पसंती दिली असल्याचे समजते.

मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिल्यानंतर सिद्धरामय्यांनी आपली राजकीय भूमिका स्पष्ट केली. ''पक्षश्रेष्ठींच्या सूचनेनुसार मी राजीनामा दिला आहे. मी पक्षश्रेष्ठींना सांगितले आहे की, मला राज्यसभेवर जायचे नाही. मी शेवटच्या श्वासापर्यंत कर्नाटकच्या राजकारणातच सक्रिय राहीन.'' असे सिद्धरामय्यांनी स्पष्ट केले. सिद्धरामय्या यांनी गुरुवारी (दि. २८ मे) त्यांच्या बंगळूर येथील निवासस्थानी

▶▶ पान २ वर

# प. बंगालमध्ये आता घुसखोरांची गय नाही!

## अमित शहा यांनी दिला कठोर इशारा; ६०० हेक्टर जमीन बीएसएफकडे सुपुर्द



गांधीनगर । वृत्तसंस्था

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी गुरुवारी पश्चिम बंगालमधील बेकायदेशीर घुसखोरीबाबत एक मोठे वक्तव्य केले आहे. भारत–बांगलादेश सीमेवर केंद्र सरकार अत्यंत आक्रमकपणे सुरक्षा व्यवस्था बळकट करण्याच्या तयारीत असल्याचे संकेत त्यांनी दिले. गुजरातच्या गांधीनगर येथे एका जाहीर सभेला संबोधित करताना गृहमंत्री शाह म्हणाले की, सीमाभागातील पायाभूत सुविधा आणि सुरक्षा व्यवस्थेला गती देण्यासाठी सुवेंदु अधिकारी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने अवघ्या सात दिवसांत सुमारे ६०० हेक्टर जमीन सीमा सुरक्षा दलाकडे सुपूर्द केली आहे.

सामरिकदृष्ट्या अत्यंत संवेदनशील असलेल्या ''चिकन नेक''

▶▶ पान २ वर

# विशाळगडावरील उरूस व पशुबळीला उच्च न्यायालयाची अटिशर्तीवर परवानगी

कोल्हापूर । वृतसंस्था

विशाळगडावरील हजरत पीर रेहान मरा साहेब दर्ग्यात बकरी ईद तसेच त्यानंतर पाच दिवस चालणाऱ्या उरूसादरम्यान पशु–पक्ष्यांचा बळी देण्यास मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाने परवानगी दिली आहे. न्यायमूर्ती रणजितसिंह राजा भोसले यांनी गुरूवारी (दि.२८) झालेल्या सुनावणीनंतर हा आदेश दिला.

न्यायालयाने महाराष्ट्र शासन, जिल्हाधिकारी कोल्हापूर, तहसीलदार शाहूवाडी, शाहूवाडी पोलीस निरीक्षक आणि पुरातत्व विभागाला आवश्यक आदेश जारी केले आहेत. विशाळगडावर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता




लक्षात घेऊन शाहूवाडी पोलिसांनी यापूर्वी तहसीलदारांकडे सार्वजनिक कार्यक्रमांवर बंदी घालण्याची मागणी केली होती. त्यानुसार भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अंतर्गत काही कालावधीसाठी बंदी आदेश लागू करण्यात आले होते. तसेच कोल्हापूर जिल्ह्यात हिंदुत्ववादी संघटनांकडून आंदोलन, मोर्चे आणि सभा

▶▶ पान २ वर

# अंबाजोगाईत नात्याला काळिमा: प्रेमसंबंधांचा भयंकर शेवट

## प्रियकराच्या मृत्यूनंतर सावत्र आईचीही गळफास लावून आत्महत्या

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथे सावत्र आई आणि मुलाच्या अनैतिक संबंधांमधून दोन जणांनी आत्महत्या केल्याची अत्यंत धक्कादायक आणि दुर्दैवी घटना उघडकीस आली आहे. बदनामीच्या भीतीने २१ वर्षीय मुलाने विष प्राशन करून, तर त्याच्या मृत्यूचा धक्का सहन न झाल्याने सावत्र आईने रुग्णालयाच्या परिसरातच गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवली. केज तालुक्यातील सोनी जवळा



येथील रहिवासी अनिल साहेबराव पवार आणि त्याची सावत्र आई अनिता साहेबराव पवार अशी मृतांची नावे आहेत. या खळबळजनक प्रकरणामुळे केज आणि अंबाजोगाई परिसरात तीव्र संताप आणि हळहळ व्यक्त होत असून, अंबाजोगाई शहर पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

सोनी जवळा येथील साहेबराव पवार यांचा पहिल्या पत्नीसोबत घटस्फोट झाल्यानंतर त्यांनी चार वर्षांपूर्वी अनिता हिच्याशी दुसरे लग्न केले होते. मात्र, याच दरम्यान साहेबराव यांच्या पहिल्या पत्नीचा मुलगा अनिल याचे आपल्या सावत्र आईशी प्रेमसंबंध जुळले. हे अनैतिक संबंध इतके विकोपाला गेले की, काही दिवसांपूर्वी अनिल आणि अनिता हे दोघे घरातून पळून थेट तेलंगणा राज्यात गेले होते. याप्रकरणी साहेबराव पवार यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली होती. अंबाजोगाई आणि केज पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे


▶▶ पान २ वर

# अकरावी प्रवेशाची आज पहिली गुणवत्ता यादी!

## विद्यार्थ्यांच्या मोबाईलवर येणार मेसेज; १२.५१ लाख विद्यार्थ्यांची नोंदणी

पुणे । प्रतिनिधी

इयत्ता अकरावी प्रवेशाची पहिली गुणवत्ता यादी आज (शुक्रवारी) सकाळी ११ वाजता प्रसिद्ध होणार आहे. पोर्टलवर कनिष्ठ महाविद्यालय वाटपाची यादी आणि गुणवत्ता यादीनुसार कनिष्ठ महाविद्यालयांच्या नावांसमोर प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांची नावे असणार आहेत.



प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या मोबाईलवर मेसेज पाठविले जाणार आहेत. विद्यार्थ्यांना ३ जूनपर्यंत प्रवेश घ्यायचे आहेत. प्रवेशासाठी राज्यातील साडेबारा लाख विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

प्रवेश फेरीच्या पहिल्या गुणवत्ता यादीचा 'कट ऑफ' अधिकच असणार आहे. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांना पहिल्या यादीत प्रवेश मिळालेला नाही, त्यांना अर्जात भरलेला महाविद्यालयांचा पसंतीक्रम बदलता येणार आहे. तत्पूर्वी, पहिल्या गुणवत्ता यादीनुसार ज्या

▶▶ पान २ वर

# शनिवारपासून उन्हात आंदोलन करणार

जालना –अंबड । प्रतिनिधी

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी येत्या ३० मे पासून अंतरवाली सराटीत रखरखत्या उन्हात आमरण उपोषण करणार असल्याचे जाहीर केले आहे. सरकारला गेल्या १० महिन्यांपासून वेळ दिला होता, त्या काळात सातारा गॅझेटिअरवर जीआर काढला गेला नाही असे जरांगे यांनी म्हटले. उन्हात आमरण उपोषणाला बसणार असून मेलो तरी चालेल असे



मनोज जरांगे म्हणाले. मला चर्चा नकोय, आरक्षणाची अंमलबजावणी पाहिजे असे मनोज जरांगे यांनी म्हटले आहे.

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी सरकारला १० महिने वेळ दिल्याचे सांगितले. माझा नाइलाज आहे, मला कोणाला दोष द्यायचा नाही, आपल्या लेकराला, समाजाला मिळत नसेल तर आपण कठोर भूमिका घेणे गरजेचे आहे. मी सीमारेषेवर आलेलो

▶▶ पान २ वर

# विधान परिषद निवडणूक : १५ जागांवर भाजपाचे वर्चस्व


## पुण्यात युती न झाल्यास 'घड्याळ' विरुद्ध 'कमळ' अटीतटीचा सामना !




विशेष प्रतिनिधी । मुंबई

**राज्यात स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून विधान परिषदेच्या १७ जागांसाठी बिगुल वाजले असून राजकीय हालचालींना वेग आला आहे. आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सर्वच पक्षांनी या निवडणुकीसाठी उमेदवारांची चाचपणी सुरू केली आहे. उपलब्ध झालेल्या सांख्यिकीय आकडेवारीवर नजर टाकल्यास, १७ पैकी तब्बल १५ जागांवर भारतीय जनता पक्षाचे संख्याबळ स्पष्ट आणि एकहाती वर्चस्व दर्शवणारे आहे. मात्र, पुणे आणि ठाण्यासारख्या महत्त्वाच्या मतदारसंघांमध्ये महायुती अंतर्गत आणि विरोधकांसोबतची गणिते कमालीची रंजक ठरणार आहेत.**

प्राप्त आकडेवारीनुसार, राज्यातील एकूण १७ मतदारसंघांपैकी १५ जागांवर भाजपने मतदारांच्या (नगरसेवक/लोकप्रतिनिधी) संख्येत मोठी आघाडी घेतली आहे. रायगड, अहिल्यानगर (अहमदनगर), नाशिक, सांगली–सातारा, यवतमाळ, भंडारा, नांदेड, परभणी आणि छ. संभाजीनगर या जिल्ह्यांमध्ये विरोधी पक्षांच्या



तुलनेत भाजपचे पारडे जड आहे. अनेक ठिकाणी संख्याबळ कमालीचे अनुकूल असल्यामुळे या १५ जागांवर भाजपचे वर्चस्व राहील आणि ही निवडणूक विरोधकांसाठी अत्यंत कठीण जाईल असे चित्र आहे. या संपूर्ण निवडणुकीत सर्वाधिक लक्षवेधी लढत पुणे मतदारसंघात होण्याची चिन्हे आहेत. पुण्यात भाजप आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे संख्याबळ

▶▶ पान २ वर

**लातूर धाराशिव बीड एकूण मतदार ९०४ त्यात भाजप ३७९ राष्ट्रवादी २०२ शिवसेना ८०**

**ठाणे** – ९९७ भाजप ४३१ शिवसेना ३०९ राष्ट्रवादी १८.

**रायगड – रत्नागिरी**–८२३ भाजप २४१ शिवसेना २७५ राष्ट्रवादी १४९.

**अहिल्यानगर**–४५२ भाजप २०७ शिवसेना ४४ राष्ट्रवादी ६४.

**जळगाव**–६६७ भाजप २७४ शिवसेना २०८ राष्ट्रवादी ५५ .

**नाशिक** –६०३ भाजप १८३ शिवसेना १६१ राष्ट्रवादी १०७.

**सोलापूर**–६१७ भाजप ३०४ शिवसेना ७६ राष्ट्रवादी ४८.

**सांगली–सातारा**–८९८ ३७१ भाजप ११० शिवसेना १४५ राष्ट्रवादी.

**पुणे**–८७८ भाजप ३३५ शिवसेना ८२ राष्ट्रवादी ३७५.

**यवतमाळ**– ४४६ भाजप १३५ शिवसेना १०४ राष्ट्रवादी २९.

**भंडारा–गोंदिया** ४३६ भाजप १९६ शिवसेना १५ राष्ट्रवादी ८३.

**वर्धा–चंद्रपूर** २६१ भाजप १४९ शिवसेना एक राष्ट्रवादी १५.

**अमरावती**–४४९ भाजप १३६ शिवसेना २३ राष्ट्रवादी काँग्रेस ८३.

**नांदेड** –४०३ भाजप १०३ शिवसेना २३ राष्ट्रवादी ८३.

**परभणी– हिंगोली** ४७३ भाजप १११ शिवसेना ७४ राष्ट्रवादी काँग्रेसचे १२३.

**छ.संभाजीनगर–जालना** ६४६ भाजप २५४ शिवसेना १४९ राष्ट्रवादी ८६.

**नागपूर**– पोटनिवडणूक ७९४ भाजपाचे एक शिवसेना ३० राष्ट्रवादी काँग्रेस पाच.

cmyk

अग्रलेख

# सामान्यांच्या आयुष्याला उष्णता आणि महागाईचा विळखा !

देशात सध्या दोन आघाड्यांवर सामान्य माणूस अक्षरश: होरपळून निघत आहे. एकीकडे विक्रमी उष्णतेच्या लाटा आणि दुसरीकडे महागाईचा भडका! उन्हाच्या झळा शरीराला भाजत आहेत, तर वाढत्या दरांचा तडाखा थेट खिशाला बसत आहे. या दुहेरी संकटाच्या छायेत देशातील सर्वसामान्य नागरिकांचे जगणे अधिक कठीण बनत चालले असताना सत्ताधारी मात्र राजकीय उत्सवांच्या जल्लोषात मग्न असल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे जनतेच्या मनात अस्वस्थता आणि नाराजी वाढत असल्याचे स्पष्ट जाणवते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या सत्तेला दहा वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने भाजप देशभर मोठ्या उत्साहात कार्यक्रमांचे आयोजन करीत आहे. राजकीय पक्षांनी आपल्या यशाचा उत्सव साजरा करणे यात गैर काहीच नाही. परंतु या उत्सवाचे टायमिंग आणि त्याची पार्श्वभूमी मात्र अत्यंत महत्त्वाची ठरते. कारण ज्या वेळी सामान्य माणूस महागाई, बेरोजगारी, इंधनदरवाढ, वाढते तापमान आणि शेतीच्या संकटाशी झुंज देत आहे, त्या वेळी सत्ता उत्सवांचा अतिरेक जनतेच्या जखमांवर मीठ चोळणारा ठरत आहे.

देशात गेल्या काही दिवसांत पेट्रोल आणि डिझेलच्या दरात सलग वाढ करण्यात आली. जागतिक परिस्थिती, युद्धजन्य तणाव आणि तेल कंपन्यांचे नुकसान यांची कारणे पुढे केली जात असली तरी प्रत्यक्षात या दरवाढीचा सर्वाधिक फटका सामान्यांनाच बसत आहे. इंधनदरवाढ म्हणजे फक्त पेट्रोल-डिझेल महाग होणे इतकाच विषय नसतो. त्याचा परिणाम वाहतूक खर्चावर होतो आणि त्यानंतर भाजीपाला, धान्य, दूध, डाळी, खाद्यतेल अशा दैनंदिन जीवनातील प्रत्येक वस्तूच्या किमती वाढतात. परिणामी महागाईचा एक मोठा साखळी परिणाम देशभर निर्माण होतो.यात सर्वात मोठा फटका बसतो तो मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबांना. आधीच घरखर्चाचा ताळमेळ बसवताना कसरत करावी लागणाऱ्या कुटुंबांसाठी आता रोजचे जगणे अधिक जिकिरीचे झाले आहे. शिक्षण, आरोग्य, वीजबिल, घरभाडे आणि प्रवासखर्च या सर्वच गोष्टी महाग होत असताना उत्पन्न मात्र त्याच जागी अडकून पडले आहे. त्यामुळे सामान्यांच्या आयुष्यातील आर्थिक ताण अधिकच तीव्र होत चालला आहे.त्यातच यंदाच्या उन्हाळ्याने अक्षरश: कहर केला आहे. देशातील अनेक राज्यांमध्ये तापमानाने विक्रमी पातळी गाठली आहे. रस्त्यांवर दुपारच्या वेळी शुकशुकाट दिसत आहे. उष्माघाताच्या घटना वाढत आहेत. कामगार, शेतमजूर, बांधकाम कामगार, रिक्षाचालक आणि रोजंदारीवर जगणाऱ्या लाखो लोकांसाठी ही उष्णता जिवावर बेतणारी ठरत आहे. वाढत्या तापमानामुळे आरोग्याच्या समस्या वाढत आहेत. पाण्याची टंचाई तीव्र होत आहे. अनेक भागांत वीजेचा वाढता वापर आणि अपुरा पुरवठा यामुळे नागरिक हैराण झाले आहेत.मान्सूनचे आगमन लांबणीवर पडल्याच्या बातम्यांनी जनतेची चिंता आणखी वाढवली आहे. शेतकरी आधीच पेरणीच्या तयारीत असताना डिझेल टंचाई आणि वाढत्या खर्चामुळे चिंतेत आहेत. शेती हा आधीच तोट्याचा व्यवसाय बनत असताना खत, बियाणे, औषधे आणि इंधन यांच्या वाढत्या किमतींमुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडत आहे. सरकारने दिलासा देण्याऐवजी काहीवेळा शेतकऱ्यांनाच दोषी धरण्याची भाषा केली जाते, हे अधिक वेदनादायक आहे. राजकीय नेतृत्वाने केवळ जागतिक परिस्थितीला दोष देऊन जबाबदारी झटकता येणार नाही. कारण जनतेने सरकार निवडताना अपेक्षा ठेवलेल्या असतात त्या संकटात आधार देण्याच्या. महागाईवर नियंत्रण, इंधनदर स्थिर ठेवणे, रोजगारनिर्मिती आणि जीवनमान सुधारण्याची जबाबदारी ही सरकारचीच असते. परंतु सध्या परिस्थिती अशी आहे की, सामान्य माणूस दिवसेंदिवस अधिक असुरक्षित आणि हतबल होत चालला आहे.याहून गंभीर बाब म्हणजे जनतेच्या या वेदनांपासून सत्ताधारी नेतृत्व दूर गेल्याचे चित्र निर्माण होत आहे. एका बाजूला सामान्य माणूस वाढत्या खर्चामुळे सहली रद्द करतो, घरखर्च कमी करतो, मुलांच्या गरजा थांबवतो; तर दुसऱ्या बाजूला राजकीय सोहळ्यांचा धडाका सुरू असतो. त्यामुळे 'विकास' आणि 'सामान्यांचे जीवन' यातील दरी अधिक ठळकपणे समोर येते. देशातील जनतेला सध्या भाषणांपेक्षा दिलासा हवा आहे. घोषणांपेक्षा ठोस उपाय हवेत. महागाई नियंत्रणासाठी प्रभावी पावले, इंधनावरील करांमध्ये कपात, शेतकऱ्यांसाठी तातडीची मदत, उष्णतेच्या संकटावर दीर्घकालीन नियोजन आणि रोजगारवाढीची दिशा यांची देशाला नितांत गरज आहे. अन्यथा सामान्य माणसाच्या संयमाचा बांध तुटण्यास वेळ लागणार नाही. एकंदर पाहता, देशातील जनता सध्या उष्णता आणि महागाई या दुहेरी संकटाच्या अग्निपरीक्षेतून जात आहे. अशा वेळी सत्ताधाऱ्यांनी जल्लोषापेक्षा जनतेच्या जखमांकडे पाहण्याची गरज अधिक आहे. कारण लोकशाहीत सत्तेचा खरा उत्सव हा जनतेच्या चेहऱ्यावर समाधान दिसले तरच मानला जातो. अन्यथा उरतो तो केवळ दिखाऊ सोहळा आणि जनतेच्या वेदनांकडे केलेले दुर्लक्ष!

## राज्यातील दोनशे नऊ साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांचे दोन हजार आठशे कोटी रुपये थकवले

### मदत नको, फौजदारी गुन्हा दाखल करा-ॲड.अजित देशमुख

**बीड । प्रतिनिधी**

**शेतकऱ्यांचा ऊस त्याच्या शेतातून नेल्यानंतर चौदा दिवसात उसाचे संपूर्ण बिल देण्याची तरतूद शुगर केन कंट्रोल ॲक्ट १९६६ मध्ये आहे. मात्र राज्यातील २०९ कारखान्यांनी २०२५/२६ या गाळप वर्षांमध्ये गाळप केलेल्या उसाचे २८००कोटी रुपये शेतकऱ्यांना दिले नसल्याची गंभीर बाब जनआंदोलनाचे विश्वस्त तथा स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष ॲड. अजित एम. देशमुख यांनी समोर आणली आहे.**

याबाबत माहिती देताना ॲड. देशमुख यांनी म्हटले की, राज्यात सन २०२५/२६ या गाळप वर्षांमध्ये २०९ कारखान्यांनी शेतकऱ्यांच्या उसाचे गाळप केले. या २०९ कारखान्यांची दैनंदिन गाळप क्षमता नऊ लाख सत्तर हजार आठशे बारा मेट्रिक टन एवढी आहे. तर या हंगामामध्ये या कारखान्यांनी एकूण दहा लाख बत्तीस हजार सातशे दहा मेट्रिक टन उसाचे गाळप केले आहे. शासनाने गाळप हंगाम सुरू होत असताना कारखान्यांना गाळप परवाना देत असताना त्यात एफ. आर. पी. ची रक्कम मुदतीत दिली जाईल याची हमी घेतलेली असते. त्याचप्रमाणे कायद्यातील तरतूद देखील याप्रमाणेच आहे. मात्र कारखाने बंद झाल्यानंतर काही महिने लोटले तरी शेतकऱ्यांचे २८०० कोटी रुपये अजूनही दिलेले नाहीत. याबाबत देशमुख यांनी साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याशी संपर्क साधल्यानंतर ही गंभीर बाब समोर आली आहे. त्यामुळे आता याबाबत देशमुख यांनी राज्यातील एफ.आर.पी. मुदतीत न देणाऱ्या साखर कारखान्यांच्या संचालकांवर गुन्हे दाखल करून विलंब कालावधीची रक्कम शेतकऱ्यांना पंधरा टक्के व्याज असलेल्या देण्याची मागणी केलेली आहे. यावर साखर आयुक्तालय काय निर्णय घेते याकडे शेतकऱ्यांची लक्ष वेधले आहे. दरम्यान, शेतकऱ्यांमध्ये एकजूट नाही. शेतकरी आपल्या हक्का प्रति भांडत नाही. शेतकऱ्यांसाठी कडे आंदोलनासाठी वेळ नाही. या सर्व बाबी साखर सम्राट यांना माहित आहेत. म्हणून हे सर्व घडत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी जागे होऊन आपापल्या कारखानदारांना एकत्र येऊन जाब विचारावा, असे आवाहन ॲड. अजित देशमुख यांनी केले आहे. आता हे साखर कारखानदार केंद्र सरकारच्या सहकार विभागाकडे जाऊन या ही रक्कम देण्यासाठी पैसे मागत आहेत. ही बाब अत्यंत चुकीची असून सर्व राजकारणी एकसारखे असून शेतकऱ्यांना बुडवण्याचे काम सातत्याने होत आहे. त्यामुळे केंद्र सरकारने साखर कारखान्यांना मदत करू नये, असे निवेदन ॲड. अजित देशमुख यांनी केंद्रीय निबंधक, सहकारी संस्था, नवी दिल्ली यांना पाठविले आहे. या कारखानदारांवर गुन्हे दाखल करून रक्कम व्याजासह द्यावी, असेही ॲड. देशमुख यांनी म्हटले आहे.



## बीडमध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त डॉ.योगेश क्षीरसागरांकडून अभिवादन

**बीड । प्रतिनिधी**

**शहरातील जवाहर कॉलनी येथे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त अर्धाकृती पुतळ्यास भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्याकडून गुरुवारी अभिवादन करण्यात आले.**

कार्यक्रमास भाजपचे युवा नेते डॉ. योगेश क्षीरसागर यांच्यासह जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे, डॉ. रवींद्र घुंबरे, ॲड. नागेश तांबारे, राहुल गुरखुदे, श्रीकृष्ण जोशी, प्रमोद हातोले तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या विचारांचा वारसा समाजापर्यंत पोहोचविण्याची गरज व्यक्त केली. उपस्थित मान्यवरांनी सावरकर यांच्या राष्ट्रभक्ती, क्रांतिकारी विचारसरणी आणि सामाजिक कार्याचा गौरव करत त्यांना अभिवादन केले. यावेळी नागरिकांची उपस्थिती होती.

## वृद्धत्व टाळण्यासाठी तणाव टाळा-डॉ.जगदीश टेकाळे

**बीड । प्रतिनिधी**

**हार्मोनल बदलांमुळे समस्या वाढू शकतात- महिलांना वेळोवेळी हार्मोनल बदलांचा अनुभव येतो. जर महिला तणावाखाली असतील, तर त्यांना हार्मोनल असंतुलनाचा सामना करावा लागतो. यामुळे पॉलीसिस्टिक ओव्हेरियन सिंड्रोम, मधुमेह आणि हृदयरोगासारख्या समस्या उद्भवू शकतात. कमजोर प्रतिकारशक्तीमुळे श्वास घेण्यास त्रास, गॅस आणि सर्दी होऊ शकते.**



अँटीऑक्सिडंटच्या कमतरतेमुळे सौंदर्य नाहीसे होऊ शकते.- दीर्घकाळच्या तणावामुळे शरीरातील अँटीऑक्सिडंट्स कमी होतात, ज्यामुळे वृद्धत्वाची प्रक्रिया वेगवान होते. यामुळे त्वचा वृद्ध होते आणि केस गळतात. निस्तेजपणा, मुरुमे आणि सोरायसिस (त्वचेचा एक आजार) यामुळेही धोका वाढतो. अतिरिक्त तणाव हा लठ्ठपणास कारणीभूत ठरणारा एक घटक आहे. आनुवंशिक वृद्धत्वात वाढ- नवीन संशोधनात असे आढळून आले आहे की, गरोदरपणात आईला येणाऱ्या उच्च तणावाचा मुलाच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर परिणाम होतो, ज्यामुळे मधुमेह आणि उच्च रक्तदाब यांसारख्या अकाली वृद्धत्वाचा धोका वाढतो, ज्याला आनुवंशिक वृद्धत्व असेही म्हणतात. या गोष्टी लक्षात ठेवा- तणावात असताना कॅफीन, निकोटीन किंवा अल्कोहोल टाळा. नियमित व्यायाम करा आणि पुरेशी झोप घ्या. एकटेपणा टाळा. आपल्या समस्या मित्रांसोबत शेअर करा. समस्यांपासून पळून जाण्याऐवजी, त्यावर उपाय शोधा. हसा आणि आनंदी राहण्याचा प्रयत्न करा. ध्यान सर्वात प्रभावी आहे. दीर्घ श्वास घ्या. अँटीऑक्सिडंटयुक्त पदार्थ (फळे, इत्यादी) खा व्हिटॅमिन ए, बी आणि सी ने समृद्ध असलेले पदार्थ खा. तणाव कमी करण्यासाठी रोजनिशी ठेवा. मित्र आणि कुटुंबासोबत वेळ घालवा. तणाव कमी करण्यासाठी अल्कोहोल किंवा अमली पदार्थांवर अवलंबून राहू नका.तणावामुळे अकाली वृद्धत्व येते. पुरुषांपेक्षा महिलांना तणाव जाणवण्याची शक्यता तिप्पट जास्त असते. तणावामुळे महिलांमध्ये केवळ मानसिक आणि शारीरिक आजारच होत नाहीत, तर त्यांचे सौंदर्यही हिरावले जाते. तणावामुळे होणाऱ्या समस्या आणि तो कसा टाळावा याबद्दल जाणून घेऊया. असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.

## मोफत नवोदय क्लास चालवणाऱ्या स्कूल'चे मुख्य कार्यकारी अधिकारी कनवारीया यांच्याकडून कौतुक

**अंबड । प्रतिनिधी**

संस्थाचालक व गुणवंतांचा गौरव ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड गुणवत्ता असते, गरज असते ती केवळ योग्य मार्गदर्शनाची. हेच ओळखून बाजार वाहेगाव येथील रायझिंग स्टार इंग्लिश मीडियम स्कूलने गेल्या चार वर्षांपासून ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी सुरू केलेल्या मोफत नवोदय क्लास या अनोख्या उपक्रमाचे जालना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कृष्ण कांत कनवारीया यांनी विशेष कौतुक केले आहे. या कौतुकास्पद कामगिरीबद्दल कनवारीया यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले, तसेच शाळेचे संस्थाचालक प्रमोद आरसूड आणि रेखा आरसूड यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

१० ते १२ तासांच्या परिश्रमाचा 'ग्रामीण पॅटर्न' ग्रामीण भागातील गरीब व गरजू पालकांना खाजगी कोचिंग क्लासेसची महागडी फी परवडत नाही. हीच अडचण ओळखून रायझिंग स्टार स्कूलने कोणतीही फी न घेता



दररोज तब्बल १० ते १२ तास विद्यार्थ्यांची तयारी करून घेण्याचा स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे. शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांची मेहनत यांमुळे या शाळेने शैक्षणिक क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटवला आहे. यंदा तालुक्यात अव्वल; ३ विद्यार्थ्यांची बाजी यावर्षी नवोदय पात्रता परीक्षेत तालुक्यातून एकूण ५ विद्यार्थी पात्र ठरले आहेत. या पाच पैकी तब्बल ३ विद्यार्थी एकट्या रायझिंग स्टार स्कूलचे आहेत. यामध्ये: शिवतेज पांडुरंग शिरसाठ विराज विजय काळे युवराज गणेश इंगोले या तीनही विद्यार्थ्यांनी नवोदय विद्यालयाला गवसणी घालत शाळेचे आणि गावाचे नाव रोशन केले आहे. विशेष म्हणजे, यातील एका विद्यार्थ्याने तालुक्यात प्रथम येण्याचा बहुमानही पटकावला आहे. ४ वर्षांची दैदिप्यमान परंपरा गेल्या चार वर्षांपासून सुरू असलेल्या या मोफत क्लासचे फलित अत्यंत कौतुकास्पद आहे. या चार वर्षांच्या कालावधीत शाळेचे ६ विद्यार्थी नवोदयसाठी पात्र ठरले आहेत, तर तब्बल ३३ विद्यार्थ्यांनी शासकीय शिष्यवृत्ती मिळवून आपल्या गुणवत्तेची चुणूक दाखवून दिली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी कृष्ण कांत कनवारीया यांनी शाळेच्या या उपक्रमाचे कौतुक करताना, ''ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी मोफत आणि इतक्या मोठ्या प्रमाणावर वेळ देऊन तयारी करून घेणे हा उपक्रम इतरांसाठी आदर्शवत आहे,'' अशा शब्दांत गौरवोद्गार काढले. या यशाबद्दल परिसरातील नागरिक, पालक आणि शिक्षण क्षेत्रातून रायझिंग स्टार स्कूलवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## जालना महापालिकेतील दोघांना लाच घेताना पकडले

**जालना । प्रतिनिधी**

**जालना महानगरपालिकातील दोन कर्मचारी श्यामसन कसबे, भाऊलाल राठोड या दोघा विरोधात आज सापळा कारवाई करण्यात आली .सरकार तर्फे फिर्याद श्री. वाल्मिक कोरे , पोलीस निरीक्षक यांनी दाखल केली. तक्रारदार वय ३७ वर्ष यांच्या तक्रारीवरून सदरील कारवाई करण्यात आली.**

भाऊलाल राठोड , वय ५७ वर्ष, व्यवसाय नोकरीं - प्रभारी सहायक अतिक्रमण पथक प्रमुख नेमणूक महानगर पालिका जालना रा. स्वामी समर्थ नगर घाटी रड जालना , २)श्यामसन कसबे वय ५१वर्ष व्यवसाय नोकरी -प्रभारी सहायक अतिक्रमण निर्मूलन पथक प्रमुख नेमणूक महानगर पालिका जालना रा. चौधरीनगर पोद्दार शाळेच्या पाठीमागे जालना तक्रारीचे स्वरूप यातील तक्रारदार हे सामाजिक कार्यकर्ते असून त्यांनी जालना शहरातील मामा चौक ते कोलू तेली घाना संघ पर्यंत नाल्यावर झालेले अतिक्रमण काढणे व नालेसफाई करणे बाबत मनपा आयुक्त अंजली शर्मा यांना विनंती केली होती. त्यावरून मा. महानगरपालिका उपायुक्त यांनी अतिक्रमण पथक प्रमुख राठोड नवीन जालना यांना सदरचे अतिक्रमण काढणे व नालेसफाई करणे साठी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून अतिक्रमण बाबत सीमांकन व रेखांकन निश्चिती करून नियमाप्रमाणे कार्यवाही करणे बाबत बाबत अतिक्रमण पथक प्रमुख श्री राठोड यांना आदेशित केले होते. त्यानुसार अतिक्रमण प्रमुख श्री राठोड व अतिक्रमण सहाय्यक पथक प्रमुख श्री कसबे हे त्यांचे पथकासह स्थळ पाहणी करून गेले होते परंतु तक्रारदार यांनी वारंवार विनंती करूनही यातील आरोपी हे सदरचे अतिक्रमण काढण्यासाठी टाळाटाळ करीत होते. तक्रारदार हे आरोपी यांना भेटून सदरचे अतिक्रमण काढण्याबाबत विचारणा केली असता आलोसे यांनी सदर अतिक्रमण काढण्यासाठी काहीतरी खर्च करावा लागेल असे असे बोलून ४० हजार रुपये लागतील अशा स्वरूपाची मागणी केली होती. परंतू तक्रारदार यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंध विभाग छत्रपती संभाजी नगर येथे समक्ष येऊन तक्रार नोंदवली या तक्रारीची पडताळणी तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २०/०३/२०२६ रोजी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी केली असता, यातील आलोसे राठोड व कसबे यांनी मामा चौक ते कोलू तेली घाना संघ पर्यंत नालीसफाई व अतिक्रमण काढण्यासाठी तक्रारदार यांचेकडे ४००००/- रुपये पंचांसमक्ष मागणी करून स्वीकारण्याचे मान्य केले . दिनांक २८/०६/२०२६ रोजी आलोसे कसबे यास शासकीय पंच समक्ष सापळा कारवाई दरम्यान बाबा टी हाऊस दवा मार्केट गेट जुना मोंढा जालना येथे तक्रारदार यांच्या कडून ४००००/- रुपये लाचरक्कम स्विकारल्या नंतर ताब्यात घेतले. त्यानंतर आलोसे श्री राठोड यास देखील ताब्यात घेण्यात आले आहे. आलोसे यांची अंगझडती मध्ये सॅमसन आणि ओप्पो कंपनीचा मोबाईल मिळून आला असून तो जप्त करून विश्लेषण करीत आहोत. आरोपी यांच्या ताब्यातून लाच रक्कम ४००००/ - रुपये जप्त केले आहे. २८/०५/२०२६ रोजी तक्रारदार यांच्या कडून लोकसेवक श्री कसबे यांनी ४० हजार रुपये पंचा स्वीकारले. याप्रकरणी तपास अधिकारी संतोष तिगोटे पोलीस निरीक्षक , श्रीमती, माधुरी केदार कांगणे मॅडम, पोलीस अधीक्षक, ला. प्र. वि. छत्रपती संभाजीनगर. श्री शशिकांत सिंगारे अपर पोलीस अधीक्षक ला. प्र. वि. छत्रपती संभाजीनगर , राजीव तळेकर, पो. उप अधिक्षक, सापळा पथक पोनि वाल्मिक कोरे' पो. नि.संतोष तिगोटे पो.हवा. राजेंद्र सिनकर, राजेंद्र जोशी. चांगदेव बागुल . ला. प्र. वि. घटक छत्रपती संभाजीनगर

## पान १ वरून...

### खरीप हंगामासाठी केंद्र सरकारकडून

आयात करतो. या गॅसपासून अमोनिया तयार केला जातो आणि त्यापासून युरिया निर्मिती केली जाते. मात्र, होर्मुझ सामुद्रधुनीतील तणावामुळे जलवाहतूक विस्कळीत झाली असून एलएनजी पुरवठा साखळीवर मोठा परिणाम झाला आहे. परिणामी काही खत उत्पादन प्रकल्पांना उत्पादन बंद ठेवावे लागले असून युरिया उत्पादनात घट झाली आहे. दरम्यान, मध्यपूर्वेतील संघर्षामुळे जागतिक बाजारात युरियाच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. याआधी भारताने काढलेल्या निविदेत जवळपास दुप्पट दराने २५ लाख टन युरिया खरेदी केल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे खत आयातीचा खर्चही मोठ्या प्रमाणात वाढला आहे. खते मंत्रालयाच्या माहितीनुसार, जून ते सप्टेंबर या खरीप हंगामात देशात सुमारे ३९० लाख टन खतांची मागणी असते. मात्र, सध्या देशात सुमारे २०० लाख टन खतसाठा उपलब्ध आहे. त्यामुळे खरीप हंगामात खतटंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन केंद्र सरकारने युरिया आयात प्रक्रियेला वेग दिला आहे.

----------

### प. बंगालमध्ये आता

कॉरिडॉरवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले असून, तिथे पाळत ठेवणे आणि राष्ट्रीय सुरक्षा उपाययोजना मजबूत करण्यासाठी सुमारे १२१ हेक्टर जमीन हस्तांतरित करण्यात आली आहे. या कारवाईमुळे बेकायदेशीर घुसखोरांवर आधीच दबाव निर्माण होण्यास सुरुवात झाली आहे. वाढती देखरेख आणि कडक अंमलबजावणीमुळे अनेक घुसखोर स्वतःहून परत जात असल्याचे अहवालातून समोर येत आहे. प्रत्येक बेकायदेशीर स्थलांतरिताची ओळख पटवून त्याला परत पाठवले जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. बेकायदेशीर स्थलांतरितांच्या प्रकरणांचा अधिक प्रभावीपणे निकाली काढण्यासाठी राज्यात डिटेंशन सेंटर्स (अटकाव केंद्रे) विकसित करण्यावरही गृहमंत्र्यांनी भर दिला. भारत-बांगलादेश सीमेवरील बऱ्याच काळापासून प्रलंबित असलेले कुंपणाचे काम लवकरच पुन्हा सुरू होण्याची शक्यता असून, घुसखोरीचे संवेदनशील मार्ग बंद करणे हे याचे उद्दिष्ट असल्याचेही अमित शहा यांनी यावेळी स्पष्ट केले.

-------------

### कर्नाटकात राजकीय

झालेल्या बैठकीत उपस्थित मंत्र्यांसमोर मुख्यमंत्रीपदावरुन पदावरून पायउतार होत असल्याच्या निर्णयाची माहिती दिली. यावेळी डी. के. शिवकुमार यांनी सिद्धरामय्या यांचे चरणस्पर्श करत त्यांचे आशीर्वाद घेतले. त्यानंतर लगेच कर्नाटक काँग्रेसने दोन्ही नेत्यांच्या भेटीची छायाचित्रे एक्स या समाजमाध्यमावर शेअर केली. एकी हीच आमची ताकद आहे! लोकसेवेसाठी आम्ही कटिबद्ध आहोत! असे पोस्टमध्ये म्हटले आहे. दरम्यान, काँग्रेसच्या पक्षश्रेष्ठींनी सिद्धरामय्या यांना राज्यसभेवर पाठवण्याची तयारी केली आहे. यामुळे कर्नाटकातील नेतृत्व बदलाचा मार्ग मोकळा झाला. डी.के. शिवकुमार यांच्या समर्थकांनी त्यांच्या निवासस्थानाबाहेर मिठाई वाटून आनंद साजरा केला.

---------------

### अंबाजोगाईत नात्याला काळिमा:

फोन ट्रॅप करून तेलंगणा गाठले आणि त्या दोघांना ताब्यात घेऊन परत आणले. आपल्या अनैतिक संबंधांची वाच्यता समाजात झाल्याच्या नैराश्यातून आणि बदनामीच्या भीतीने अनिल याने विषारी औषध प्राशन केले होते. प्रकृती खालावल्याने नातेवाईकांनी त्याला तातडीने अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयात उपचारार्थ दाखल केले. मात्र, चार दिवसांची झुंज अपयशी ठरून उपचार सुरू असतानाच अनिलचा मृत्यू झाला. आपल्या प्रियकराच्या मृत्यूची बातमी समजताच अनिता हिला तीव्र धक्का बसला आणि तिने रुग्णालयाच्या व्यंकटराव डावळे सभागृहाच्या पाठीमागे असलेल्या एका शासकीय झाडाला गळफास लावून आत्महत्या केली. रुग्णालयाच्या परिसरात मृतदेह आढळताच वैद्यकीय महाविद्यालयाचे डॉक्टर धपाटे यांनी तातडीने अंबाजोगाई शहर पोलिसांना पाचारण केले. माहिती मिळताच पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक कांदे व मंगेश भोले हे पथकासह घटनास्थळी दाखल झाले. डॉक्टर निलेश पुरी आणि डॉक्टर नितीन साखरे यांनी कायदेशीर वैद्यकीय तपासणी करून अनिता हिला मृत घोषित केले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठवला आहे. नात्याच्या सर्व मर्यादा ओलांडून एकत्र आलेल्या या जोडप्याच्या अशा भयानक अंतामुळे सामाजिक आणि कौटुंबिक व्यवस्थेच्या चिंधड्या उडाल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

------------

### विशाळगडावरील उरूस व पशुबळीला

आयोजित होण्याची शक्यता लक्षात घेऊन अप्पर जिल्हाधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ अन्वये निर्बंध लागू केले होते. याच पार्श्वभूमीवर तहसीलदार शाहूवाडी यांनी पशुबळी, स्वयंपाक आणि चूल पेटविण्यासही मनाई करणारी अधिसूचना काढली होती. शाहूवाडी पोलिसांनीदेखील दंगलीची पार्श्वभूमी आणि संभाव्य तणाव लक्षात घेऊन उरूस, पशुबळी आणि भाविकांच्या मुक्कामासाठी परवानगी नाकारली होती. राज्य शासन आणि जिल्हा प्रशासनाच्या वतीने मुख्य सरकारी वकील ॲड. शिरीष हरे, ॲड. नेहा भिडे आणि सहायक सरकारी वकील ॲड. शुभांगी देशमुख यांनी न्यायालयात युक्तिवाद करताना विशाळगडावरील परिस्थिती लक्षात घेता पशुबळीला परवानगी देता येणार नसल्याचे सांगितले. तर दर्गा ट्रस्टच्या वतीने ॲड. सतीश तळेकर यांनी भारतीय राज्यघटनेतील कलम २५ नुसार धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार असल्याचा युक्तिवाद केला. कायदा व सुव्यवस्था राखणे हे पोलिसांचे कर्तव्य असून, धार्मिक कार्यक्रमांवर बंदी घालून घटनात्मक अधिकार हिरावून घेता येणार नाहीत, असे त्यांनी न्यायालयास सांगितले. तसेच यापूर्वीही न्यायालयाने उरूस आणि पशुबळीस परवानगी दिल्याचा दाखला देण्यात आला. दर्गा प्रशासनाने उरूसादरम्यान स्वच्छता राखण्याची, पशुबळीतील अवशेषांची योग्य विल्हेवाट लावण्याची तसेच पोलिस प्रशासनाला पूर्ण सहकार्य करण्याची ग्वाही न्यायालयात दिली. उभय पक्षांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने मागील अटींवर यंदाही उरूस आणि पशुबळीला परवानगी दिली. तसेच मुख्य प्रकरणाच्या अंतिम सुनावणीसाठी ८ जून २०२६ रोजी तारीख निश्चित करण्याचे आदेश दिले.

-------------

### शनिवारपासून उन्हात

आहे, ३० मे चे आमरण उपोषण ठरवले आहे, त्यात बदल केला आहे. आमरण उपोषण सावलीत, मंडपात, फॅनमध्ये आपण ते करत होतो, सगळे तसेच करतात. मला अंतिम टोकाचे आणि कठोर आमरण उपोषण करायचे आहे, रखरखत्या उन्हात हे उपोषण बाज टाकून करणार आहे. ना कुठले पाणी, ना कुठले जेवण, ना पायात चप्पल घालणार असे मनोज जरांगे म्हणाले. माझ्या शरीरात प्रचंड वेदना आहेत, जे काही होईल ते होईल, उष्माघाताचा बळी गेला तर देवेंद्र फडणवीसांमुळे गेला, सरकारमुळे गेला. कितीही जीवाची लाही लाही झाली तरी हरकत नाही, कारण माझ्या समाजाच्या लेकरांच्या आयुष्याचा उन्हाळा झाला, तर आपण आपली कदर का करायची असे मनोज जरांगे म्हणाले. आमरण उपोषण कुठेही होईल, जंगलात होईल, रानात होईल, कडक उन्हात ते उपोषण होईल यावर मी ठाम आहे. किती वेदना होतील याचा विचार करायचा नाही हे ठरवलं आहे. सारखी सारखी उपोषणं करून जीवाला वेदना होत आहेत. एकदा तुकडा पडू देत, सरकारचा तुकडा पडेल किंवा माझा तुकडा पडेल. हे आंदोलन सुरू आहे त्याला तीन वर्षे झाली आहेत. मे महिन्याच्या कडक रखरखत्या उन्हात हे आमरण उपोषण होणार आहे असे मनोज जरांगे यांनी म्हटले.

**कुणबी मराठा मंत्रालय स्थापन करायला वेळ का लागतोय?**

माझ्या समाजाच्या लेकराचा उन्हाळा होतोय, ते कुठेतरी थांबले पाहिजे. आमरण उपोषण फायनल झाले आहे, यात बदल होणार नाही. मराठा समाजाने अंतरवाली सराटीकडे येऊ नये, असेही मनोज जरांगे यांनी आवाहन केले आहे. देशात इतके टोकाचे आमरण उपोषण झाले असेल असे वाटत नाही, असेही जरांगे यांनी म्हटले. प्रसाद लाड, राधाकृष्ण विखे पाटील येणार की नाही हे मला माहिती नाही. २९ ऑगस्टपासून उद्यापर्यंत १० महिन्यांचा वेळ दिला आहे.

-------------

### अकरावी प्रवेशाची आज पहिली

विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी कॉलेज मिळाले आहे, त्याठिकाणी प्रवेश घ्यायचा असल्यास अर्जात 'प्रोसिड फॉर ॲडमिशन'वर क्लिक करावे. त्यानंतर कागदपत्रे पडताळणीसाठी त्या महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे व प्रवेश निश्चित करावा. याशिवाय ज्या विद्यार्थ्यांना मिळालेल्या महाविद्यालयात प्रवेश घ्यायचा नसल्यास त्यांनी त्यास नकार कळवायचा आहे. कोटा (व्यवस्थापन, संस्थाअंतर्गत व अल्पसंख्यांक कोटा) प्रवेशाचीही पहिली यादी शुक्रवारीच (दि. २९) प्रसिद्ध होणार आहे. विद्यार्थ्यांनी प्रवेश घेऊन राहिलेल्या जागा दुसऱ्या प्रवेश फेरीपूर्वी महाविद्यालयांना प्रसिद्ध कराव्या लागणार आहेत. त्यानुसार विद्यार्थ्यांना त्यांचा पसंतीक्रम निवडता येणार आहे. अकरावी प्रवेशाची दुसरी प्रवेश फेरी ५ जूननंतर प्रसिद्ध होईल. त्यानंतर काही दिवसांच्या अंतराने उर्वरित तीन प्रवेश फेऱ्या देखील जाहीर होतील. त्यानंतर १ जुलै किंवा १५ जुलैपासून अकरावीचे वर्ग सुरु होतील, यादृष्टीने माध्यमिक शिक्षण विभागाने नियोजन केले आहे.

**एकूण पाच प्रवेश फेऱ्या, प्रत्येक फेरीपूर्वी नावनोंदणी**

अकरावी प्रवेशाच्या एकूण पाच फेऱ्या होणार असून, शेवटची फेरी मुलींसाठी विशेष असणार आहे. प्रत्येक प्रवेश फेरीपूर्वी ज्या विद्यार्थ्यांनी अकरावी प्रवेशासाठी नोंदणी केलेली नाही, त्यांना संकेस्थळावर नोंदणी करता येणार आहे. प्रवेश फेऱ्या पूर्ण होईपर्यंत विद्यार्थ्यांची नोंदणी सुरुच राहणार आहे.

-------

### विधान परिषद निवडणूक :

एकमेकांना तगडी टक्कर देणारे म्हणजेच तुलनात्मक आहे. दोन्ही पक्षांचे संख्याबळ जास्त असल्यामुळे महायुतीकडून ही जागा नेमकी कोणाकडे जाणार, यावर जोरदार खल सुरू आहे. जर येथे सलोखा झाला नाही किंवा मित्रपक्षांमध्ये अंतर्गत स्पर्धा झाली, तर पुण्याची जागा अत्यंत प्रतिष्ठेची आणि अटीतटीची ठरेल. ठाणे हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि महायुतीचा बालेकिल्ला मानला जातो. या मतदारसंघात एकूण ९९७ मतदार असून येथे महायुतीचे वर्चस्व असले, तरी राष्ट्रवादी आणि इतर मित्रपक्षांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. नांदेडमध्ये ९०४ मतदार तर परभणीमध्ये ४७३ मतदार असून, येथेही स्थानिक समीकरणांनुसार उमेदवारांची चाचपणी केली जात आहे. ठाणे ९९७ महायुतीचे वर्चस्व, उमेदवारांची चाचपणी. पुणे ४४६ भाजप विरुद्ध राष्ट्रवादी अजित पवार संख्याबळ अटीतटीचे. रायगड ८२८ भाजपचे वर्चस्व. अहमदनगर ४५२ भाजपचे पारडे जड. नाशिक ६०३ भाजप अनुकूल. अशी सदस्य संख्या आहे, त्यामुळे बहुतांशी विधान परिषदेच्या या निवडणुकीत भाजपाचे मतदारसंघ मोठ्या प्रमाणात दिसत आहेत. यातील जवळपास १५ जागेवर महायुतीचे वर्चस्व दिसून येत आहे. त्यातही भाजपच पावरफुल असल्याचे दिसते. या १७ जागांच्या निकालांचा थेट परिणाम आगामी विधानसभा निवडणुकीच्या जागावाटपावर आणि राजकीय मनोधैर्यावर होणार आहे. १५ जागांवर भाजप सुरक्षित स्थितीत दिसत असला, तरी पुण्यात राष्ट्रवादी (अजित पवार गट) आणि भाजप यांच्यातील अंतर्गत संख्याबळाची स्पर्धा महायुतीसाठी डोकेदुखी ठरू शकते. त्यातच महाविकास आघाडीनेही सर्व १७ जागांवर लढण्याची तयारी सुरू केल्यामुळे, ही निवडणूक बिनविरोध न होता प्रत्यक्ष मैदानात लढली जाण्याची शक्यता अधिक आहे. आता भाजप आपल्या १५ जागा राखण्यात यशस्वी होतो की पुण्याच्या जागेवरून महायुतीत नवा पेच निर्माण होतो, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

शुक्रवार, दि. २९ मे २०२६

३

## थोडक्यात

### श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे रविवार रोजी महादेव महाराज चाकरवाडी यांचे कीर्तन

बीड । प्रतिनिधी



विसाव्या शतकातील महान संत .किसनबाबा यांच्या २८ व्या वर्षातील दहाव्या पुण्यतिथी अधीक जेष्ठ शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प. महादेव महाराज चाकरवाडी ता. जि.बीड यांचे रविवार दिनांक ३१ मे २०२६ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे अवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व बाभुळखुंटा ता.जि.बीड यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.

### जायकवाडी धरणातील हक्काच्या पाण्यासाठी बैलगाडी मोर्चात सहभागी व्हा - डॉ.ढवळे

बीड । प्रतिनिधी

जायकवाडी धरणातील मराठवाड्यासह बीड जिल्ह्याच्या हक्काच्या पाण्यासाठी लोकल आंदोलनाच्या वतीने शुक्रवार दि.२९ रोजी जिल्हा स्टेडियम ते जिल्हाधिकारी कार्यालय असा बैलगाडी मोर्चा काढण्यात येणार असून, या मोर्चात शेतकरी, शेतकरी पुत्र तसेच शेतकऱ्यांविषयी संवेदना असलेल्या नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केले आहे.



डॉ. ढवळे म्हणाले की, दुष्काळाचे सावट असलेल्या बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना वारंवार आस्मानी आणि सुलतानी संकटांचा सामना करावा लागत आहे. मराठवाड्याच्या हक्काचे कृष्णा खोऱ्यातील २५ टीएमसी पाणी देण्यास पश्चिम महाराष्ट्रातील नेते टाळाटाळ करत आहेत. मराठवाडा, विशेषतः बीड जिल्हा, सिंचनाच्या मोठ्या अनुशेषाला सामोरे जात आहे.कोकणातील १६८ टीएमसी अतिरिक्त पाणी नदीजोड प्रकल्पातून मराठवाड्याकडे वळविण्याचे नियोजन असून, हे काम नियोजित वेळेत पूर्ण करून बीड जिल्ह्यातील शेतीला पाणी मिळावे, अशी मागणीही त्यांनी केली. तसेच गोदावरी-सिंदफणा नदीजोड प्रकल्प तातडीने राबवून त्यासाठी सर्व्हे करण्यात यावा, अशीही मागणी त्यांनी केली आहे.यासोबतच कोकणातून येणाऱ्या १६८ टीएमसी पाण्यातून बीड जिल्ह्याला किती पाणी देता येईल, याचा स्वतंत्र सर्व्हे करावा. गेवराई तालुक्यातून जाणारा उजवा कालवा आणि माजलगाव धरणातून जायकवाडी धरणाला मिळणारे पाणी पूर्ववत करण्यात यावे, अशा मागण्याही त्यांनी मांडल्या.या सर्व मागण्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या बैलगाडी मोर्चात जिल्ह्यातील शेतकरी व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन डॉ. गणेश ढवळे यांनी केले आहे.

### सौर पॅनल वादळी वाऱ्याने गेले उडून, शेतकऱ्याचे झाले मोठे नुकसान

चौसाळा प्रतिनिधी

चौसाळा व परिसरात गेल्या चार-पाच दिवसापासून अवकाळी पावसासह वादळी वाऱ्याने चांगलाच धुमाकूळ घातला आहे. या भागातील अनेकांचे सौर पॅनल उडाले, मोठमोठे झाडे उन्मळून पडले या सह आंबा, उन्हाळी कांदा, फळबागा, उन्हाळी भाजीपाला याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. २३ मे रोजी सायंकाळी सातच्या दरम्यान आलेल्या अवकाळी पावसा सह वादळी वाऱ्याने हिंदी बुद्रुक येथील शेतकरी श्रीमंत सखाराम कोकणे यांच्या मांगाचा मळा शेतातील गट नंबर ७२ मधील इकोझेन कंपनीचे पाच एच पी चे सोलर पॅनल उडून गेल्याने मोठे नुकसान झाले आहे. या दोन-चार दिवसाच्या अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानीचे संबंधित विभागामार्फत पंचनामे करून तातडीने त्यांना मदत देण्याची मागणी शेतकऱ्याकडून करण्यात येत आहे.



# बकरीईदच्या पूर्वसंध्येला आष्टीत कारवाई

## शिवशंकर स्वामींच्या पाठपुराव्यामुळे ५२ गोवंशांची सुटका

आष्टी । प्रतिनिधी

**बकरीईदच्या पार्श्वभूमीवर आष्टी तालुक्यातील महादेव मंदिर परिसरात बाबळीच्या झाडीत संशयास्पदरीत्या गोवंश बांधून ठेवण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली असून, शिवशंकर स्वामी आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या सतर्कतेमुळे तब्बल ५२ गोवंशांचे प्राण वाचविण्यात यश आले आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून, गोमाफियांविरोधात कठोर कारवाईची मागणी होत आहे.**



मिळालेल्या माहितीनुसार, आष्टी पोलीस स्टेशन हद्दीतील आष्टी गावातील महादेव मंदिर परिसरातील बाबळी झाडीत बकरीईदच्या कुर्बानीसाठी सुमारे १०० गोवंश आणून बांधून ठेवण्यात आल्याची खात्रीशीर माहिती शिवशंकर स्वामी यांना मिळाली होती. माहिती मिळताच त्यांनी कोणताही विलंब न करता आपल्या सहकाऱ्यांसह पुण्यावरून आष्टीकडे धाव घेतली. या मोहिमेत कृष्णा सातपुते, शुभम शिंदे आणि आकाश घारे यांनी सक्रिय सहभाग घेतला. संबंधित घटनेची माहिती तात्काळ आष्टी पोलिसांना देण्यात आली आणि कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. त्यानंतर पोलिसांनी शिवशंकर स्वामी यांच्या सहकार्याने संबंधित ठिकाणी छापा टाकला. छाप्यामध्ये घटनास्थळी ४९ गायी-बैल आणि ३ म्हशीचे रेडकू असे एकूण ५२ गोवंश बाबळीच्या झाडीत बांधलेल्या अवस्थेत आढळून आले. मात्र, पोलिसांची चाहूल लागताच काही गोमाफियांनी अंधाराचा फायदा घेत अनेक गोवंश पळवून नेल्याचे समोर आले आहे. जप्त करण्यात आलेल्या सर्व गोवंशांना सुरक्षित ताब्यात घेण्यात आले असून पुढील कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे. दरम्यान, पळवून नेण्यात आलेले गोवंश आष्टी आणि खडकत परिसरात बकरीईदच्या दिवशी कत्तलीसाठी नेले जाण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे पोलिसांकडून शोधमोहीम अधिक तीव्र करण्यात आली असून, संवेदनशील भागांवर विशेष लक्ष ठेवण्यात येत आहे. या प्रकरणामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असले तरी पोलिसांनी नागरिकांना शांतता राखण्याचे आवाहन केले आहे. तसेच कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता संशयास्पद हालचालींची माहिती तात्काळ पोलिसांना देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. शिवशंकर स्वामी यांनीही नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करताना सांगितले की, ''गोवंशांची अवैध वाहतूक, संशयास्पद हालचाली किंवा कत्तलीसाठी जनावरे नेली जात असल्याची माहिती मिळाल्यास तात्काळ पोलीस हेल्पलाईन ११२ किंवा ९९२१४८११०२ या क्रमांकावर संपर्क साधावा.'' या कारवाईदरम्यान आष्टी पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक श्री. भुतेकर, श्री. साळुंखे, पोलीस हवालदार क्षीरसागर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी तत्परतेने कारवाई करत मोलाचे सहकार्य केल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. या घटनेमुळे बकरीईदच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील गोवंश तस्करी आणि अवैध कत्तलीच्या प्रकारांवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## सिटीझनचे कार्यकारी संपादक चंदन पठाण यांना 'यंग जर्नलिस्ट ऑफ द इयर २०२६' पुरस्कार जाहीर

बीड । प्रतिनिधी

गेल्या दोन दशकांपासून पत्रकारिता क्षेत्रात आपल्या लेखणीचा दरारा निर्माण करणारे आणि बीड शहरातील प्रसिद्ध दैनिक 'सिटीझन'चे कार्यकारी संपादक चंदन पठाण यांना यंदाचा अत्यंत मानाचा यंग जर्नलिस्ट ऑफ द इयर २०२६ पुरस्कार जाहीर झाला आहे. 'साप्ताहिक युवा लोकमित्र' वृत्तपत्राच्या ५ व्या वर्धापन दिनानिमित्त आणि ६ व्या वर्षात पदार्पण सोहळ्याचे औचित्य साधून 'युवा लोकमित्र परिवार'च्या वतीने या पुरस्काराची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे.



'साप्ताहिक युवा लोकमित्र'तर्फे विविध क्षेत्रांत उल्लेखनीय व आदर्शवत कामगिरी करणार्या कर्तृत्ववान व्यक्तींना सन्मानित करण्यात येते. पुरस्कार निवड समितीने पत्रकारिता क्षेत्रातील निष्पक्ष, निर्भीड आणि सातत्यपूर्ण योगदानासाठी चंदन पठाण यांच्या नावावर एकमुखाने शिक्कामोर्तब केले आहे.चंदन पठाण हे गेल्या २० वर्षांपासून पत्रकारिता क्षेत्रात सक्रिय कार्यरत आहेत. सामान्य जनतेचे प्रश्न प्रशासनासमोर मांडणे, सामाजिक समस्यांना वाचा फोडणे आणि बीड जिल्ह्याच्या विकासात्मक मुद्द्यांवर सातत्याने प्रकाश टाकणे ही त्यांच्या पत्रकारितेची प्रमुख वैशिष्ट्ये राहिली आहेत. दैनिक 'सिटीझन'चे कार्यकारी संपादक म्हणून जबाबदारी सांभाळताना त्यांनी अनेक नवोदित पत्रकारांना मार्गदर्शन केले असून, तरुण पिढीमध्ये पत्रकारितेची नवी ऊर्जा निर्माण केली आहे. त्यांच्या याच प्रदीर्घ अनुभवाला आणि तरुण सुलभ उत्साहाला दाद म्हणून त्यांना 'यंग जर्नलिस्ट ऑफ द इयर' या पुरस्काराने गौरविण्यात येत आहे.

हा दिमाखदार पुरस्कार वितरण सोहळा येत्या शनिवार, २० जून २०२६ रोजी संध्याकाळी ०६:०० वाजता 'ताज पॅलेस', कादरपुरा, बार्शीनाका, बीड येथे अत्यंत उत्साहात पार पडणार आहे. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि प्रशासकीय क्षेत्रातील अनेक दिग्गज मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हा सोहळा पार पडणार आहे.

चंदन पठाण यांनी आपल्या २० वर्षांच्या पत्रकारितेत नेहमीच तत्त्वांना आणि जनहिताला प्राधान्य दिले. दैनिक सिटीझनच्या माध्यमातून त्यांनी पत्रकारितेचा एक वेगळा दर्जा निर्माण केला आहे. त्यांच्यासारख्या अभ्यासू आणि ऊर्जावान संपादकाचा सन्मान करताना युवा लोकमित्र परिवाराला अत्यंत अभिमान वाटत आहे असे साप्ताहिक युवा लोकमित्रचे संपादक शेख ताहेर जाफर यांनी म्हटले आहे.

पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल चंदन पठाण यांच्यावर पत्रकारिता क्षेत्रातून, विविध राजकीय नेत्यांकडून, सामाजिक संघटनांकडून आणि मित्रपरिवाराकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## पान ६ वरुन...

### बीडमध्ये शिवाजीनगर पोलिसांचे

याला 'कल्याण' नावाचा मटका जुगार खेळवताना अटक केली.

(या दोन्ही आरोपींकडून १,१०,४४०/- आणि १,०८,२६०/- रुपयांचा मुद्देमाल, तसेच दोन विना नंबरच्या दुचाकी - स्प्लेंडर प्लस आणि क्सेस स्कूटी जप्त करण्यात आल्या.)

जायका हॉटेल शेजारी (नगर रोड): मटका आकडे लिहिणाऱ्या शेख युसुफ शेख नझीर (रा. बालेपीर, बीड) याला ४२,७२०/- रुपयांच्या मुद्देमालासह ताब्यात घेतले.

पालवण चौक (हॉटेल डी राज शेजारी): लक्ष्मण आबा पवार (वय २९, रा. गोविंद नगर, बीड) हा शेडसमोर लॅपटॉपवर ऑनलाईन 'चक्री' नावाचा जुगार खेळवत असताना त्याला पोलिसांनी पकडले. त्याच्याकडून ५४,७००/- रुपयांचा मुद्देमाल (एक एच.पी. कंपनीचा लॅपटॉप, की-बोर्ड आणि माउस) जप्त करण्यात आला. अटक करण्यात आलेल्या या चारही जुगार चालकांविरुद्ध कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियमांतर्गत स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलिसांचा कडक कारवाईचा इशारा

ही यशस्वी कामगिरी पोलीस अधीक्षक यांच्या आदेशान्वये आणि पोलीस निरीक्षक बल्लाळ साहेब यांच्या थेट मार्गदर्शनाखाली पोउपनि सागर सोत्रे, सफौ/१२४४ राऊत आणि शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या विविध पथकांनी बजावली आहे. शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत सण-उत्सवाच्या काळात शांतता भंग करणारे कोणतेही अवैध धंदे खपवून घेतले जाणार नाहीत. अशा गुन्हेगारांवर यापुढेही कडक कारवाई केली जाईल, असा सज्जड इशारा पोलीस प्रशासनाच्या वतीने देण्यात आला आहे.

### अंबाजोगाई शहर घरफोडी

केली आहे. तसेच हे आरोपी यशवंतराव चव्हाण चौकाजवळ, मोरेवाडी जाणाऱ्या रोडच्या बाजूला थांबलेले आहेत.

माहिती मिळताच पोलीस पथकाने तातडीने त्या ठिकाणी छापा टाकला. पोलिसांनी शिवम कसबे आणि दोन विधीसंघर्ष बालकांना ताब्यात घेतले.

गुन्ह्याची कबुली आणि मुद्देमाल जप्त

ताब्यात घेतलेल्या संशयितांकडे पोलिसांनी विश्वासात घेऊन कसून चौकशी केली असता, त्यांनी सदर गुन्ह्याची कबुली दिली. त्यांच्याकडून चोरीला गेलेल्या मुद्देमालापैकी १० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने (अंदाजे किंमत १,५०,०००/- रुपये) जप्त करण्यात आले आहेत. या गुन्ह्याचा पुढील तपास अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक आनंद शिंदे करत आहेत.सदरची धडक कारवाई प्रभारी पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके मॅडम, सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री. ऋषीकेश शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली:

स्थानिक गुन्हे शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड

अंबाजोगाई शहरचे प्रभारी शरद जोगदंड

पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे

पोलीस अंमलदार: मारुती कांबळे, रामचंद्र केकान, विष्णू सानप, गोविंद भताने, युनूस बागवान, गोविंद राख, सचिन आंधळे, विकी सुरवसे आणि पांडुरंग काळे (अंबाजोगाई शहर पो.ठा.) यांच्या संयुक्त पथकाने केली आहे.

### पात्रुडमध्ये बकरी ईद उत्साहात

देण्यासाठी गावातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी माजी सरपंच एकनाथ मस्के यांनी मुस्लिम बांधवांना बकरी ईदच्या शुभेच्छा देत बंधुभाव आणि सामाजिक एकतेचा संदेश दिला. तसेच सरपंच नौशाद लतीफ मोमीन, उपसरपंच घनश्याम भुतडा, ग्राम विकास अधिकारी भागवत भुजबळ, कैलास आलझेंडे, बाळासाहेब बनकर आणि पत्रकार प्रकाश यादव यांची प्रमुख उपस्थिती होती.

सर्व मान्यवरांनी गावातील सामाजिक सलोखा, परस्पर प्रेम आणि एकतेची परंपरा कायम ठेवण्याचे आवाहन केले. सर्व समाजातील नागरिक एकत्र येऊन प्रत्येक सण उत्साहात साजरा करत असल्यामुळे पात्रुड गावाची ओळख आदर्श गाव म्हणून निर्माण होत असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

## न्याय मिळेपर्यंत आंबेडकर घराणे दळवी कुटुंबाच्या पाठीशी

### आनंदराज आंबेडकर यांचा शब्द; आर्थिक मदत, शासकीय नोकरी व घरकुलासाठी प्रशासनाला सूचना

बीड । प्रतिनिधी



बीड शहरातील मातंग समाजातील युवक उमेश दळवी यांच्या झालेल्या निर्घृण हत्येप्रकरणी रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांनी गंभीर दखल घेत दळवी कुटुंबीयांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून त्यांना धीर दिला. ''या प्रकरणात पूर्ण न्याय मिळेपर्यंत आंबेडकर घराणे तुमच्या पाठीशी ठामपणे उभे राहील,'' असा विश्वास त्यांनी कुटुंबीयांना दिला.

रिपब्लिकन सेनेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सूर्यवंशी तसेच बीड जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम गोटू वीर यांनी उमेश दळवी यांच्या पत्नी, आई, भाऊ व बहिणीची भेट घेऊन संपूर्ण घटनेची माहिती आनंदराज आंबेडकर यांना दिली. त्यानंतर आनंदराज आंबेडकर यांनी तात्काळ पोलीस प्रशासन, समाजकल्याण विभाग तसेच संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. दळवी कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने त्यांच्या पत्नीला शासकीय नोकरी, तातडीची आर्थिक मदत तसेच घरकुल योजना मंजूर करण्यासाठी संबंधित विभागांनी त्वरित कार्यवाही करावी, अशा सूचना त्यांनी समाजकल्याण अधिकाऱ्यांना दिल्या. समाजकल्याण विभागामार्फत देण्यात येणारी आर्थिक मदत तात्काळ वितरित करण्यात यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

याचबरोबर पोलीस अधीक्षकांशी दूरध्वनीवरून संपर्क साधत या प्रकरणातील इतर संशयित आरोपींनाही ताब्यात घेण्यात यावे, पुरवणी एफआयआरमध्ये संबंधितांची नावे समाविष्ट करावीत तसेच अ‍ॅट्रॉसिटी कायद्यान्वये अधिक कठोर कलमे लावून पीडित कुटुंबाला न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. दरम्यान, रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम वीर, प्रदेशाध्यक्ष सूर्यवंशी तसेच पदाधिकारी बीडमध्ये तळ ठोकून असून, न्याय मिळेपर्यंत आंदोलनात्मक भूमिका कायम ठेवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

## पार्किंगचे नियम धाब्यावर बसवणाऱ्या बेशिस्त ऑटोरिक्षांना वाहतूक पोलीसांचा दणका

बीड । प्रतिनिधी

शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत व नियमामध्ये राहण्यासाठी प्रभारी पोलीस अधिक्षक चेतना तिडके मॅडम यांच्या आदेशावरुन दि.२६ मे २०२६ मंगळवार दुपारी ४ ते सायं.६ च्या दरम्यान जिल्हा वाहतुक शाखेचे पोलीस निरीक्षक वैभव पाटील आणि जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांच्या मार्गदर्शनाखाली पो.हवालदार सखाराम घोलप, पोलीस अंमलदार संतोष मोरे, राहुल घाडगे, मोहन बन्सोडे, चेतन दहातोंडे, चालक पोलीस हवालदार हारके, नारायण वाघमारे या पोलीस कर्मचाऱ्यांनी शहरातील महत्वपुर्ण बाजारपेठेच्या ठिकाणी ऑटोरिक्षाचालकांवर कारवाई केली.



शहरातील वाहतूक शिस्त मोडणाऱ्या आणि नियमांना हरताळ फासणाऱ्या ऑटोरिक्षांविरोधात जिल्हा वाहतुक पोलीसांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. विशेष तपासणी मोहिमेदरम्यान तब्बल २१ ऑटोरिक्षाचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. सदरील कारवाई ही जालना रोडवरील वंदना हॉटेलसमोर, अण्णाभाऊ साठे चौक, सांगली बँक कॉर्नर, सुभाष रोड, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक या भागात करण्यात आली यावेळी जिल्हा वाहतूक पोलीसांच्या अवैध पार्किंग, रस्त्यावर अडथळा करणे, वाहतूक नियमांचे उल्लंघन, कागदपत्रांची त्रुटी आढळून आल्याने २१ रिक्षाचालकांवर कारवाई करण्यात आली यावेळी १० हजार रुपयांचा दंड रिक्षाचालकांकडून वसूल करण्यात आला. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि शहरातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी अशा मोहिमा यापुढेही सुरुच राहतील असे जिल्हा वाहतूक पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांनी म्हणले आहे.

नियम मोडणाऱ्या कोणत्याही वाहनधारकाला यापुढे सुट दिली जाणार नाही-जिल्हा वाहतूक पोलीस निरीक्षक वैभव पाटील

वाहनांची कागदपत्रे, विमा, ड्रायव्हींग लायसन्स, प्रवासांची मर्यादा, पीयुसी अशा नियमांची पुर्तता करावी तसेच वाहतूकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रिक्षाचालकांना तसेच इतर वाहनधारकांना यापुढे कोणतीही सुट दिली जाणार नाही अशी माहिती जिल्हा वाहतूक पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांनी सांगितले आहे.

## मराठवाड्याच्या हक्काच्या पाण्यासाठी मोर्च्यात सामील व्हा - प्रा. सुशीलाताई मोराळे

बीड । प्रतिनिधी

दिनांक २९ मे २०२६ रोजी जिल्हा स्टेडियम पासून लोकलढा आंदोलनाच्या वतीने मराठवाड्यासह बीड जिल्ह्याच्या हक्काच्या पाण्यासाठी बैलगाडी मोर्चाचे आयोजन करण्यात आले असून मानवी जीवनात, पाण्याचे अनमोल स्थान आहे, हा मोर्चा सकाळी १० वाजता निघणार असून, बीड जिल्हा हा कायम दुष्काळी जिल्हा आहे. इथली शेती कोरडवाहू आहे कधी आस्मानी तर कधी सुलतानी तर कधी अवकाळीचा फटका या शेतकऱ्यांना बसतो आणि उद्ध्वस्त करून जातो. पाणी म्हणजे जीवन हे सूत्र आहे मात्र आमच्या हक्काचे कृष्णा खोऱ्याचे २५ टीएमसी पाणी देण्यास पश्चिम महाराष्ट्राचे नेते तयार होत नाहीत. शेतकऱ्यांच्या ज्वलंत प्रश्नासाठी लढणाऱ्या लोकलढा आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आव्हान किसान संघर्ष समितीच्या वतीने प्रा. सुशीलाताई मोराळे यांनी केले आहे.



मराठवाड्याचा विशेषतः बीड जिल्ह्याचा सिंचनाचा बॅकलॉग फारमोठा आहे राज्यपाल पी.सी. अलेक्झांडर यांना स्वतः त्यांच्या अभिभाषणात या अनुशेषा बाबत सरकारला धारेवर धरले होते. त्यानंतर काही प्रमाणात अपुरी धरणे पूर्ण केली गेली, मात्र आज त्या धरणात पाण्यापेक्षा गाळच जास्त साचलेला आहे. आमच्या जिल्ह्यातील धाराशिव जिल्ह्यातील बऱ्याच लहान मोठ्या नद्या या दक्षिणेकडे वाहत जातात आणि त्या कृष्णा नदीला जाऊन मिळतात. या सगळ्या उपनद्याचे पाणी कृष्णेत जाते.

म्हणून आमचा कृष्णा नदीच्या पाण्यावर हक्क आहे. वारंवार मागणी करू नये हे पाणी आम्हाला मिळत नाही. आजपर्यंत बीड जिल्ह्यात जितकी धर्म बांधली गेली त्यासाठी आंदोलनेच करावी लागली. १९७४ चे मराठवाडा विकास आंदोलनाचे फलित म्हणजे जायकवाडीचे धरण आणि माजलगाव चे बॅक वॉटर आहे. हजारो एकर जमीन त्यामुळे ओलिताखाली आली गोदावरी खोरे महामंडळामार्फत मोठ मोठे बॅरेजेस बांधण्यात आले त्यामुळे अनेक गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटू शकला. लोकलढा आंदोलकांनी केलेल्या सर्व मागण्या महत्त्वाच्या असून त्यासाठी ते संघर्ष करीत आहेत एक जबाबदार नागरिक म्हणून या आंदोलनात सहभागी होणे हे आपले कर्तव्य आहे म्हणून त्यांच्या निमंत्रणाची वाट न बघता या लढ्यात तन-मन-धनाने सहभागी व्हावे असे आवाहन प्रा. सुशीलाताई मोराळे यांनी शेतकरी, शेतमजूर, नागरिकांना केले आहे.

# देशातील धान्य उत्पादनात १८८ लाख टनांनी वाढ

## भात, गहू, मका पीक सर्वाधिक, केंद्रीय कृषी मंत्रालयाचा पीक उत्पादन अंदाज

दिल्ली / वृत्तसंस्था

जूनमध्ये संपत असलेल्या २०२५-२६ या पीक वर्षात देशातील एकूण धान्य उत्पादन ५ टक्के वाढून ३,७६५.६३ लाख टन टनांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. मुख्यतः भात, गहू आणि मका पिकाच्या उत्पादनात अधिक वाढ दिसून येते, असे केंद्रीय कृषी मंत्रालयाने जाहीर केलेल्या ताज्या पीक उत्पादन अंदाजात म्हटले आहे. गेल्या वर्षी झालेल्या चांगल्या पावसामुळे चालू पीक वर्षात विक्रमी उत्पादन मिळण्यास हातभार लागला. हे धान्य उत्पादन गेल्या वर्षीच्या तुलनेत १८८ लाख टनांनी अधिक असल्याचे केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी म्हटले आहे.



भाताचे विक्रमी १,५४० लाख टन, गहू १,२०० लाख टन आणि मक्याचे विक्रमी ५५० लाख टन उत्पादनाचा अंदाज आहे. तर तृणधान्यांचे १७६ लाख टन, तूर ३५ लाख टन, हरभरा १२५ लाख टन आणि मसूरच्या १७ लाख टन उत्पादनाची शक्यता आहे.

अवकाळी पाऊस आणि गारपिटीने काही प्रमाणात पीक नुकसान झाले असतानाही, २०२५-२६ च्या पीक वर्षात गहू उत्पादन जवळपास २.३ टक्के वाढून १,२०० लाख टन टनांवर पोहोचण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. एकूण तेलबिया उत्पादन ४३०.५९ लाख टन राहण्याचा अंदाज आहे. भुईमूग १३०.७४ लाख टन इतक्या विक्रमी उत्पादनाचा टप्पा गाठणार आहे. सोयाबीन उत्पादन १२५.९६ लाख टन राहील. ऊस उत्पादन विक्रमी ५०००.६३ लाख टन, तर कापूस उत्पादन २९०.२४ लाख गाठी आणि ताग उत्पादन ९१.७६ लाख गाठी होण्याचा अंदाज आहे. केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी देशाच्या इतिहासातील आतापर्यंतचे हे सर्वाधिक धान्य उत्पादन ठरू शकते, असे म्हटले आहे.

देशात विक्रमी धान्य उत्पादन झाले आहे. याबाबतचा तिसरा अंदाज जाहीर केला आहे. यावर्षी एकूण ३,७६५.६३ लाख टन धान्य उत्पादनाचा अंदाज आहे. हे उत्पादन गेल्या वर्षीच्या तुलनेत १८८ लाख टनांनी अधिक असल्याचे चौहान यांनी सांगितले.

जगात कितीही मोठे संकट आले तरी, भारतात कोणीही उपाशी राहणार नाही. आपली गोदामे धान्यांनी भरली आहे. त्यामुळे कोणतीही चिंता करण्याचे कारण नाही, असा दावा त्यांनी केला आहे. या महत्त्वाच्या योगदानाबद्दल माझा शेतकऱ्यांना प्रणाम. तसेच आमचे कृषी पथक, आयसीएआरचे शास्त्रज्ञ आणि राज्यांतील अधिकाऱ्यांचेही अभिनंदन करतो, असे ते म्हणाले. नवी दिल्ली येथे दोन दिवसीय राष्ट्रीय कृषी परिषद खरीप अभियान २०२६ च्या उद्घाटन कार्यक्रमात बोलत होते. दरम्यान, आगामी खरीप हंगामावर एल निनोचे सावट आहे.

या धोक्याच्या पार्श्वभूमीवर भारतीय हवामान विभागाने यंदा सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज वर्तवला आहे. याआधी उद्भवलेल्या एल निनो परिस्थितीमुळे भात आणि मका यांसारख्या प्रमुख खरीप पिकांच्या उत्पादनात १० टक्केहून अधिक घट झाली असल्याचे दिसून आले आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६६० : चार्ल्स दुसर्‍याची इंग्लंडच्या राजेपदी पुनर्स्थापना.
१७२७ : पीटर (दुसरा) रशियाचा झार बनला.
१८४८ : विस्कॉन्सिन अमेरिकेचे ३० वे राज्य झाले.
१९१४ : ओशियन लाइनर आर.एम.एस. इंप्रेस ऑफ आयर्लंड जहाज बुडून त्यात १९९२ लोक ठार झाले.
१९१९ : अल्बर्ट आइनस्टाइन यांच्या सामान्य सापेक्षता सिद्धांताची चाचणी घेण्यात आली.
१९५३ : उत्तुंग अशा एव्हरेस्ट शिखरावर शेर्पा तेनसिंग याने ब्रिटिश गिर्यारोहक एडमंड हिलरी बरोबर चढाई करुन पहिले पाउउल ठेवले.
१९८५ : पाय नसलेल्या स्टीव फोन्योने व्हिक्टोरिया, ब्रिटिश कोलंबिया येथे मॅरॅथॉन शर्यत पूर्ण केली. ४२ कि.मी. अंतर पार करण्यास फॉन्योला चार महिने लागले.
१९९९ : स्पेस शटल डिस्कव्हरी पहिल्यांदाच आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाला जोडले गेले.
२००७ : जपान देशाच्या महिला रियो मोरी यांनी विश्वसुंदरी चा किताब पटकाविला.
२००८ : भारतीय जनता पक्षाचे नेता वी. एस. येदुरप्पा यांनी कर्नाटक राज्याच्या मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली.
२०१० : भारताच्या तत्कालीन राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांनी हेनान प्रांतातील लुओयांग येथे पहिल्या शतकातील प्राचीन श्वेताश्वा व्हाईट हॉर्स मंदिर संकुलात भारतीय शैलीतील बौद्ध मंदिराचे उद्घाटन केले.
२०१९ : ट्रांसजेंडर हे मानसोपचार आजाराच्या यादीतून जागतिक आरोग्य संघटनेने काढून टाकले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८६५ : कलकत्ता शहरावर आधारित मासिक पुस्तिका मॉडर्न रिव्ह्यूचे संस्थापक व संपादक तसचं हिंदू महासभेचे नेता, स्वातंत्र्य सेनानी रामानंद चटर्जी यांचा जन्मदिन.
१९०५ : हिराबाई बडोदेकर, किराणा घराण्याच्या गायिका.
१९०६ : भारतीय-इंग्लिश लेखक टी. एच. व्हाईट यांचा जन्म. (मृत्यू: १७ जानेवारी १९६४)
१९०६ : साली पद्मश्री पुरस्कार सन्मानित भारतीय पत्रकार, लेखक आणि स्वातंत्र्यसैनिक कन्हैयालाल प्रभाकर मिश्रा यांचा जन्मदिन.
१९१४ : एव्हरेस्टवीर शेर्पा तेनसिंग नोर्गे यांचा जन्म. (मृत्यू: ९ मे १९८६)
१९१७ : अमेरिकेचे लोकप्रिय अध्यक्ष जॉन केनेडी यांचा जन्म.
१९२९ : ब्रिटिश भौतिकशास्त्रज्ञ पीटर हिग्ज यांचा जन्म.
१९४७ : शोर्य चक्र पुरस्कार सन्मानित भारतीय वायुसेना दलाचे माजी वायुसेना दल प्रमुख एअर चीफ मार्शल फली होमी मेजर यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८१४ : नेपोलियन बोनापार्ट यांची पहिली पत्नी जोसेफिन डी बीअर्नार्नास यांचे निधन. (जन्म: २३ जून १७६३)
१८२९ : विद्युत पृथक्करणाद्वारे सोडिअम आणि पोटॅशिअम ही मूलद्रव्ये प्रथमच वेगळी करणारे इंग्लिश भौतिक व रसायनशास्त्रज्ञ सर हंफ्रे डेव्ही यांचे निधन. (जन्म: १७ डिसेंबर १७७८)
१८९२ : बहाई पंथाचे संस्थापक बहाउल्ला यांचे निधन. (जन्म: १२ नोव्हेंबर १८१७ तेहरान, इराण)
१९३३ : भारतीय स्वातंत्र्य सेनानी, पत्रकार आणि संघटन कर्ता लोकराम नयनराम शर्मा यांचे निधन.
१९५४ : व्हिक्टोरिया क्रॉस पुरस्कार प्राप्त ब्रिटीश सैन्य दलाचे थोर सैनिक फ्रेडरिक विल्यम हेजेस यांचे निधन.
१९७१ : प्रख्यात भारतीय चित्रपट अभिनेते पृथ्वीराज कपूर यांचे निधन.
१९७२ : पृथ्वीराज कपूर, हिंदी चित्रपटअभिनेता. (जन्म: ३ नोव्हेंबर १९०१)
१९७७ : भाषाशास्त्रज्ञ सुनीतिकुमार चटर्जी यांचे निधन (भाषाशास्त्रज्ञ, साहित्य व संस्कृतीचे अध्यापक) (जन्म: २६ नोव्हेंबर १८९०)
१९८७ : चौधरी चरण सिंग, लोकदलाचे संस्थापक, भारताचे ५ वे पंतप्रधान. (जन्म: २३ डिसेंबर १९०२)
२००७ : महाराष्ट्र राज्य लता मंगेशकर पुरस्कार विजेते प्रसिद्ध भारतीय हिंदी व मराठी चित्रपट संगीतकार स्नेहल भटकर यांचे निधन. (जन्म: १७ जुलै १९१९)
२०१० : समाजवादी विचारवंत, स्वातंत्र्यसैनिक ग. प्र. प्रधान यांचे निधन. (जन्म: २६ ऑगस्ट १९२२)
२०२० : अजित जोगी (छत्तीसगढचे पहिले मुख्यमंत्री).

# 'अविशान' जातीच्या मेंढ्या वर्षातून ६ ते ८ कोकरांना देतात जन्म; व्यवसाय केल्यास मिळेल मोठा फायदा!



मांस तसेच लोकर व्यवसाय करण्यासाठी देशात बहुतेकजण आता मेंढ्यापालन व्यवसायाकडे वळलेले आहेत. सर्वसामान्य शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात हा व्यवसाय लोकप्रिय होत आहे, कारण त्यात कमी खर्चात जास्त नफा मिळतो. तसेच मांसाबरोबरच लोकरीलाही बाजारात मोठी मागणी आहे. विशेष म्हणजे मेंढीपालनाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध राज्यांतील सरकारे शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान देत आहेत. मात्र असे असतानाही केवळ सुधारित जातींची माहिती नसल्यामुळे बहुतेक मेंढीपालकांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. ज्यांच्या व्यवसायातून शेतकरी मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळवू शकतात, या मेंढीच्या जातीचे नाव आहे 'अविशान'.

'अविशान' ही मेंढ्यांची प्रगत जात असून त्याचे वजन खूप वेगाने वाढते. या जातीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे ते एकाच वेळी ३ ते ४ कोकरांना जन्म देते. त्याचबरोबर 'अविशान' जातीच्या मेंढ्या वर्षातून दोनदा गर्भधारणा करतात. म्हणजेच ती एका वर्षात ६ ते ८ मुलांना जन्म देऊ शकते. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी 'अविशान' जातीच्या मेंढ्या पाळल्यास त्यांना मोठा नफा मिळेल. ते मांस तसेच लोकर मोठ्या प्रमाणावर विकू शकतात.

अविशान मेंढ्यांचा इतिहास :अविशान मेंढ्यांचा क्लोन तयार करण्यासाठी शास्त्रज्ञांना खूप मेहनत घ्यावी लागली. १९९७ मध्ये पश्चिम बंगालमधील सुंदरबन येथून गारोल जातीच्या मेंढ्या आणण्यात आल्या. यानंतर मालपुरा येथील मेंढ्यांसह या जातीचा क्रॉसिंग करून क्लोन तयार करण्यात आला. परंतु शास्त्रज्ञांना पूर्ण यश मिळाले नाही. कारण या मेंढ्यांच्या जातीचा मृत्यूदर जास्त होता. शिवाय दूध देण्याची क्षमताही कमी होती. यानंतर गुजरातच्या पाटणवाडी जातीच्या मेंढ्या मालपुरा येथील मेंढ्यांसह क्रॉस करण्यात आल्या. मग मेंढीची प्रगत जात ''अविशान'' जन्माला आली. हे सामान्य जातीच्या मेंढ्यांपेक्षा जास्त दूध देते. शिवाय, त्याची प्रजनन क्षमता देखील जास्त आहे. वर्षातून दोनदा गर्भधारणा होते.

केवळ ५ टक्के मृत्युदर :अविशान कोकरू इतर जातीच्या मेंढ्यांपेक्षा ३० टक्के वेगाने वाढतात. कोकरे जन्मानंतर लगेचच विक्रीसाठी तयार होतात, त्यामुळे शेतकऱ्यांना कमी खर्च येतो. सध्या उत्तर प्रदेश, आंध्र प्रदेश, राजस्थानसह अनेक राज्यांतील शेतकरी अविशान मेंढ्या मोठ्या प्रमाणावर पाळत आहेत. या मेंढ्यांच्या मृत्यूचे प्रमाण केवळ ५ टक्के आहे. मांसासाठी ३ महिन्यांचे कोकरू विकता शकता. एक कोकरू साधारणपणे २५०० रुपयांना विकले जाते. जर तुम्ही ५० मेंढ्यांसह अविशान शेती सुरू केली असेल तर तुम्ही एका वर्षात किमान २०० कोकरू विकू शकता.

# लिंबूवर्गीय फळ पिकांमध्ये उंच वाफे लागवड प्रणाली

भारतातील एकूण फळपिक क्षेत्रापैकी सुमारे ५ लाख हेक्टर क्षेत्रामध्ये लिंबूवर्गीय पिकाची लागवड केली जात असून एकूण उत्पादन सुमारे ४२.८ लाख टन एवढे आहे. सर्व लिंबूवर्गीय उत्पादक राज्यांपैकी, महाराष्ट्र राज्यात लिंबूवर्गीय पिक क्षेत्र (१.६० लाख हेक्टर) व उत्पादन (६.२ लाख टन) या बाबतींत एक आघाडीचे राज्य आहे. भारतात लिंबूवर्गीय फळे म्हणजे संत्रा, मोसंबी आणि लिंबू त्यांच्या अंतर्गत एकूण क्षेत्रफळाच्या (३.४८ लाख हेक्टर) अनुक्रमे ५०, २० आणि १५ टक्के आहे.

भारतातील लिंबूवर्गीय फळांच्या लागवडीखालील एकूण क्षेत्रापैकी सुमारे ४२% क्षेत्र संत्रा पिकाने व्यापलेले आहे. मोसंबी (सायट्रस सायनेन्सिस) हे राज्यातील सर्वात प्रचलित लिंबूवर्गीय फळ असून ते महाराष्ट्राच्या विदर्भ भागात आणि मध्य प्रदेशच्या लगतच्या भागात मोठ्या प्रमाणावर घेतले जातात.

उंच वाफा :

उंच वाफा ही एक आधुनिक लागवड पद्धत आहे ज्यामध्ये जमिनीच्या क्षेत्रफळानुसार १-२ मीटर रुंदीचे उंच वाफे तयार केले जातात. हि पद्धत कमी पाण्याच्या भागात फळझाडांच्या लागवडीसाठी वापरली जाते. मुसळधार पाउस असलेल्या भागातही या पद्धतीत झाडे उंच वाफ्यावर न कोसळता वाढू शकतात तसेच पाण्यासोबत खते वाहून जाणे, मूळकुज होणे इत्यादी नुकसान टाळले जातात. उंच वाफा पद्धतीचा मुख्य फायदा म्हणजे सरींमध्ये पाणी साचले जाते व त्यामुळे जमिनीतील पाण्याची पातळी वाढते.

उंच वाफा लागवड पद्धतीची आवश्यकता :उंच वाफ्यावर फळझाडे वाढवण्याचे अनेक फायदे आहेत जसे की वसंत ऋतूमध्ये माती लवकर तापते, त्यामुळे लवकर लागवड करता येते, पाण्याचा सहज निचरा होऊ शकतो. लिंबूवर्गीय फळ झाडांची मुळे जमिनीत जास्त खोलवर जात नाहीत. त्यामुळे उंच वाफ्यातील पाणी, खते व पोषक द्रव्य यांचा झाडांच्या वाढीसाठी पुरेपूर उपयोग होतो. झाडांच्या वाढीसाठी मोकळी माती आवश्यक असते कारण मोकळ्या मातीमध्ये झाडाच्या मुळांना वाढण्यासाठी भरपूर जागा मिळते. पारंपारिक पद्धतीपेक्षा उंच वाफे पद्धत अधिक फायदेशीर ठरते. उंच वाफ्यांमुळे शिसे आणि इतर जड धातूंनी दूषित असलेल्या जमिनीवरही झाडांची सुरक्षितपणे वाढ होणे शक्य होते. या पद्धतीमुळे मातीची सुपीकता आणि गुणवत्ता सुधारते तसेच मातीचे भौतिक, रासायनिक आणि जैविक गुणधर्मात वाढ होते व क्षारतेची समस्या कमी होते. सुधारित पाणी व्यवस्थापन, उत्तम पाण्याचा निचरा व साठवण, कमी बाष्पीभवन तसेच वारा/पाणी यांची धूप कमी होते.

भाजीपाल्याची आंतरपीके :

उंच वाफ्यावर लिंबूवर्गीय फळझाडांच्या लागवडीला चाळ क्षेत्रात भाजीपाला आंतरपीक घेण्यास वाव आहे. आयसीएआर-सीसीआरआयच्या प्रयोगाने शेतकऱ्यांना नवा मार्ग दाखवला आहे. टोमॅटो, वांगी भेंडी, कोबी आणि मुळा या भाज्यांचे उत्पादन घेता येते. टोमॅटो, वांगी, भेंडी आणि झेंडूच्या फुलांनीही मर्यादित क्षेत्रात (५०३० चौ.मी.) एवढी उत्पादकता दाखवून चांगली कामगिरी केली आहे.



# बाजरीचे कमी कालावधीचे वाण आणि घरीच बीजप्रक्रिया

बाजरी हे मुळातच कमी पाण्यात येणारे पीक आहे. त्यात यंदा पाऊस कमी असल्याचा प्राथमिक अंदाज हवामानशास्त्र विभागाने दिल्यामुळे बाजरीची लागवड यंदा फायदेशीर राहू शकते. परंतु बाजरीची लागवड करण्यासाठी कमी कालावधीचे आणि सुधारित वाण शेतकऱ्यांसाठी उपयोगी राहू शकतात, असा सल्ला बाजरी संशोधनातील तज्ज्ञांनी दिला आहे. तसेच बाजरीच्या चांगल्या उत्पादनासाठी त्याची बीजप्रक्रिया अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

शिफारशीतील वाण :बाजरी ३ महिन्यात काढणीला येते. तरी बाजरी संशोधन केंद्राने फुले आदिशक्ती, ए.एच.बी. १२०० लोह, ए.एच.बी १२६९ या संकरित वाणांची आणि फुले धनशक्ती वाणाची शिफारस केली आहे. हे चारही वाण गोसावी रोगासाठी प्रतिकारक असून यातील ए.एच.बी. १२०० आणि १२६९ हे वाण अरगट आणि करपा रोगासाठीही प्रतिकारक्षम आहे. या दोन्ही वाणांमध्ये लोह आणि जस्त या पोषणमुल्यांचे प्रमाण भरपूर आहे. तसेच फुले धनशक्ती हा वाण सर्वात कमी दिवसात म्हणजेच केवळ ७४ ते ७८ दिवसात तयार होणारा वाण आहे.



उगवणक्षमता तपासणी :बियाणे पेरणीपूर्वी त्याची उगवणक्षमता तपासणी करणे आवश्यक आहे. बाजरीच्या पेरणीसाठी उगवणक्षमता ७० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त असावी.

बाजरीची बीजप्रक्रिया करताना ती मीठाची, रासायनिक आणि जैविक अशा तिन्ही बीजप्रक्रिया कराव्यात. आणि त्याचा क्रमही तसाच असावा.

मीठाची बीजप्रक्रिया :घरचे बियाणे असल्यास १० लिटर पाण्यात २ किलो मीठ ते विरघळावे. त्यात एक एकर क्षेत्रासाठी लागणारे भिजवावे. यातील पाण्यावर तरंगणारे, पोटच बियाणे काढून टाकावे. बियाणे १० ते १५ मिनिटं भिजवून निरोगी जड बियाणे स्वच्छ पाण्यात २ ते ३ वेळा धुवावे. मीठाच्या बीजप्रक्रियेमुळं बाजरीवरील अरगट रोगाचं नियंत्रण होतं. बियाणे सावलीत वाळवून रासायनिक बीजप्रक्रिया करावी.

रासायनिक बीजप्रक्रिया :गोसावी किंवा केवडा रोगांपासून बाजरी पिकाला संरक्षण मिळण्यासाठी मेटॅलॅक्झील ३५ टक्के डब्लूएस हे बुरशीनाशक प्रति किलो बियाण्याला सहा ग्रॅम बुरशीनाश या प्रमाणात चोळावे. ते सावलीत पूर्णपणे सुकवून मग कीटकनाशकाची प्रक्रिया करावी. यासाठी इमिडाक्लोप्रिड ४८ टक्के एफएस हे कीटकनाशक १० मिली प्रति किलो बियाणे या प्रमाणात घेऊन चोळावे. यामुळे खोडकिडा, खोडमाशी आणि वाळवी या किडींपासून संरक्षण मिळते. त्यानंतर ३ तासांनी जैविक बीजप्रक्रिया करावी.

जैविक बीजप्रक्रिया :पिकाला नत्र, स्फुरद, पालाश यांची उपलब्धता वाढवण्यासाठी जैविक बीजप्रक्रिया आवश्यक असते. त्यामुळे पिकांची जोमदार वाढ होते. अझोस्पिरिलम किंवा अझोटोबॅक्टर अधिक पीएसबी म्हणजे स्फुरद विरघळवणारे जिवाणू अधिक केएमबी म्हणजेच पालाश उपलब्ध करुन देणारे जिवाणू यांची बीजप्रक्रिया करावी. ही बीजप्रक्रिया झाल्यावर ४ तासांच्या आत पेरणी करावी.


# लेमन ग्रास ची शेती करून मिळवू शकता मोठा नफा

सध्याच्या काळात शेतकरी विविध प्रकारे नवनवीन तंत्रज्ञान आणि नवनवीन पिकांचे प्रयोग करताना दिसत आहेत. ज्यातून त्यांना चांगला नफाही मिळतो आहे. असेच एक पीक म्हणजे लेमन ग्रास होय. याचा वापर बहुतांशी कॉस्मेटिक, डिटर्जंट, आणि औषधांमध्ये केला जातो. कमी कालावधी मध्ये तयार होणाऱ्या या पिकाला सध्या चांगली मागणी आहे.

औषधी वनस्पती असल्याने याचे बरेच उपयोग आहेत. योग्य तंत्राचा वापर करून या पिकाची लागवड केल्यास चांगला नफा मिळू शकतो. तसेच यासाठी लागणारी गुंतवणूकही कमी असते. याची लागवड केल्यानंतर चार महिन्यांमध्येच हे पीक तयार होते. औषधांसोबतच या पिकापासून बनवलेल्या तेलाला देखील बाजारात चांगली मागणी आहे आणि किमतही चांगली मिळते. लागवडीनंतर सहा वर्ष चालते :या पिकाच्या शेतीचे वैशिष्ट्य म्हणजे या पिकासाठी कोणत्याही प्रकारच्या खताची आवश्यकता भासत नाही. आणि हे पीक एकदा पेरले की पाच ते सहा वर्षापर्यंत ते चालते. याची पेरणी फेब्रुवारी ते जुलै च्या दरम्यान करता येते. एकदा याची पेरणी केली की, पाच ते सहा वेळा याची कापणी करता येते.फायद्याचे गणित :यापासून तयार केल्या जाणाऱ्या तेलाची किंमत हजार ते दीड हजार रु लिटर अशी असते. एका एकरातून साधारण ५ ते ६ लिटर तेल निघते. गणिती रुपात हिशोब करायचा झाल्यास याच्या लागवडीसाठी ३० ते ४० हजार रु. खर्च येतो आणि एका वर्षात ३ ते ४ वेळा याची कापणी करता येते. म्हणजे साधारण वर्षाकाठी १ ते दीड लाख रु. इतके उत्पादन या पिकातून मिळते. त्यामुळे जर कमी कालावधीत चांगला नफा मिळवायचा असेल तर लेमन ग्रास ची शेती करायला हरकत नाही.



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत



# मान्सून पूर्वतयारीसाठी आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज -जिल्हाधिकारी मित्तल

## मोती तलाव येथे आपत्कालीन शोध व बचाव साहित्याची रंगीत तालीम

जालना। प्रतिनिधी

आगामी मान्सून कालावधीच्या पार्श्वभूमीवर संभाव्य आपत्कालीन परिस्थितीला तात्काळ व प्रभावी प्रतिसाद देता यावा, तसेच आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा अधिक सक्षम व सज्ज राहावी यासाठी जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण आशिमा मित्तल यांच्या निर्देशानुसार व जालना शहर महानगरपालिका आयुक्त अंजली शर्मा, निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण शशिकांत हदगल यांच्या मार्गदर्शनाखाली जालना शहरातील मोती तलाव येथील विसर्जन कुंड परिसरात जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभाग व अग्निशमन विभाग, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने आपत्कालीन शोध व बचाव साहित्याची भव्य रंगीत तालीम आयोजित करण्यात आली



होती.यावेळी जिल्हाधिकारीआशिमा मित्तल, मनपा आयुक्त अंजली शर्मा, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी दिपक काजळकर तसेच अग्निशमन अधिकारी संदीप दराडे यांची प्रमुख उपस्थिती होती. याशिवाय अग्निशमन विभाग, जालना, बदनापूर व अंबड येथील अधिकारी व कर्मचारी, तसेच रायगड येथे प्रशिक्षण पूर्ण करून आलेले 'आपदा मित्र' मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. रंगीत तालीमेदरम्यान पूर, अतिवृष्टी, पाण्यात अडकलेल्या नागरिकांचा बचाव, आपत्कालीन स्थलांतरण तसेच नैसर्गिक आपत्तीच्या प्रसंगी वापरण्यात येणाऱ्या अत्याधुनिक शोध व बचाव साहित्यांचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. यामध्ये फायबर बोट, इन्फ्लाटेबल रबर बोट, स्कुबा सेट, फायर जेल ब्लँकेट, लाईफबोये, बॅटरी कटर, बॅटरी स्प्रेडर, फ्लोटींग पंप, पोर्टेबल जनरेटर, पोर्टेबल पंप, मेगाफोन, सेफ्टी नेट, लाईफ जॅकेट व रिफ्लेक्टर जॅकेट आदी साहित्यांच्या कार्यपद्धती व वापराबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच पाण्यात बुडणाऱ्या व्यक्तीचा सुरक्षितरित्या बचाव कसा करावा, पूरस्थितीत रबर बोटीद्वारे नागरिकांचे स्थलांतरण कशा पद्धतीने करावे, आपत्कालीन परिस्थितीत समन्वय साधून तात्काळ प्रतिसाद कसा द्यावा याबाबत अग्निशमन विभागामार्फत प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण देण्यात आले. मान्सून कालावधीत उद्भवणाऱ्या संभाव्य नैसर्गिक आपत्तींचा प्रभाव कमी करण्यासाठी तसेच नागरिकांच्या जीवित व मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्यात येत असून, अशा प्रकारच्या रंगीत तालीम व प्रशिक्षण उपक्रमांमुळे आपत्ती प्रतिसाद यंत्रणांमध्ये समन्वय, तत्परता व कार्यक्षमता अधिक बळकट होत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

## जामखेडमध्ये साखळी उपोषण सहाव्या दिवशीही सुरूच; प्रशासनाकडून अद्याप दखल नाही



जामखेड। प्रतिनिधी

जामखेड नगरपरिषदेला 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जामखेड नगरपरिषद' असे नाव देण्याच्या मागणीसाठी सुरू करण्यात आलेले साखळी उपोषण आज सहाव्या दिवशीही सुरूच असून, प्रशासनाकडून अद्याप कोणतीही ठोस दखल घेण्यात आलेली नाही. त्यामुळे आंदोलन अधिक तीव्र होत असल्याचे चित्र दिसत आहे. सामाजिक कार्यकर्ते पांडुरंग माने यांच्या नेतृत्वाखाली नगरपरिषद कार्यालयासमोर हे आंदोलन सुरू आहे.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीचे औचित्य साधून नगरपरिषदेला त्यांचे नाव देण्यात यावे, या मागणीसाठी गेल्या अनेक महिन्यांपासून पाठपुरावा करण्यात येत आहे. मात्र, प्रशासनाकडून अद्याप कोणताही निर्णय न झाल्याने आंदोलनाचा पवित्रा अधिक आक्रमक करण्यात आला आहे.

उपोषणाच्या पहिल्या काही दिवसांत प्रशासनातील अधिकारी आणि पोलिसांनी आंदोलनस्थळी भेट देऊन आंदोलकांशी चर्चा केली होती. आंदोलनाची भूमिका आणि मागण्यांची माहितीही त्यांनी जाणून घेतली होती. मात्र, सहा दिवस उलटूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने आंदोलकांमध्ये नाराजी वाढली आहे. उपोषणाच्या सहाव्या दिवशीही कार्यकर्ते आणि नागरिकांनी आंदोलनस्थळी उपस्थित राहून मागणीला पाठिंबा दिला. प्रशासनाने तातडीने नामकरणाचा निर्णय घ्यावा, अन्यथा येत्या काळात आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल, असा इशारा आंदोलकांनी दिला आहे. सामाजिक कार्यकर्ते पांडुरंग माने यांचे साखळी उपोषण सहाव्या दिवशीही सुरू राहिल्याने प्रशासन या आंदोलनाची नेमकी कधी दखल घेणार, याकडे जामखेडकरांचे लक्ष लागले आहे.

## || थोडक्यात

### पुजारी ने घेतला विठ्ठलाचा जीव!

#### पीआयवर गुन्हा नोंदवण्यासाठी वंचितचा पाथर्डी पोलीस ठाण्यावर निषेध मोर्चा!

पाथर्डी । प्रतिनिधी

तालुक्यातील कोरडगाव परीसरातील औरंगपूर गावातील आदिवासी पीडित महिलेने आपल्यावर १ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या अत्याचाराची तक्रार सोमवारी पाथर्डी पोलिस ठाण्यात दाखल केली आहे जातीवाचक शिवीगाळ करुन महीलेवर अत्याचार करुन तिचे घर पेटवुन देवुन रोख रक्कम नेली असल्याची फिर्याद महीलेने पोलिसात दिली आहे पाथर्डी तालुक्यातील औरंगपूर येथील पीडित आदिवासी महिलेने गंभीर स्वरूपाच्या अत्याचार मारहाण व चोरीच्या प्रकरणात गुन्हा दाखल करण्याची मागणी करत सोमवारी सायंकाळी पाथर्डी पोलीस ठाण्यासमोर आपल्या मुलासह अंगावर ज्वलनशील द्रव्य ओतून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याने एकच खळबळ उडाली सुदैवाने तेथे उपस्थित असलेल्या पोलिस कर्मचारी व होमगार्ड यांनी तत्परता दाखवत दोघांनाही रोखल्याने मोठा अनर्थ टळला या घटनेमुळे पोलीस ठाण्याबाहेर बराच वेळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते दरम्यान सुरू असलेल्या गोंधळात विठ्ठल रावसाहेब खर्चन (वय ४५ रा.आखेगाव ता.शेवगाव) हे अचानक जमिनीवर कोसळले उपस्थित पोलिसांनी त्यांना तातडीने पाथर्डी उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती विठ्ठल खर्चन यांना मृत घोषित केले घटनेची माहिती मिळताच अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कुलबर्गे शेवगाव पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे व उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू यांनी तातडीने पाथर्डी पोलीस ठाण्यात धाव घेत परिस्थितीचा आढावा घेतला अखेर बुधवारी पीडित महिलेची फिर्याद नोंदवून घेत १६ आरोपीवर गुन्हा दाखल केला असून मयत विठ्ठल खर्चन मृत्यूप्रकरणी येत्या महिनाभरात सखोल चौकशी करून पोलीस अधीक्षक ममुक्का सुदर्शन यांच्याकडे अहवाल दिला जाईल व दोषी अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई केली जाईल असे लेखी आश्वासन अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैभव कुलबर्ग यांनी आंदोलनकर्त्यांना दिल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.

### बारमधील काम करणाऱ्या महिलेकडून अभियंताला धमकी देऊन१२ लाखाचा गंडा

जालना। प्रतिनिधी

एकत्रित काढलेले फोटो पत्नी आणि वडिलांना पाठवुन समाज माध्यमावर बदनामी करण्याची धमकी देवून मुंबई येथे एका बारमध्ये काम करणाऱ्या महिलेने जालन्यातील अभियंत्याला चक्क १२ लाखाचा गंडा घातला आहे. याबाबत थोडक्यात माहीती अशी की, चेतन संतोष लोखंडे (३४) हे व्यवसायाने स्थापत्य अभियंता असून त्यांचे नेहमीच मुंबई येथे व्यवसायाच्या निमित्ताने जाणे येणे असते. दिड वर्षापासून वाशी येथील सेंटर पॉईंट बारमध्ये त्यांची ओळख राशीसिंग उर्फ अर्चना मनोजसिंग या ३५ वर्षीय महिलेसोबत झाली. त्यावेळी दोघांनी एकमेएकाचे मोबाईल नंबर घेवून संपर्क वाढवला. सदरील महिलेने चेतन लोखंडे यांना मॅसेज आणि फोन कॉल करून मैत्री घट्ट केली. त्यानंतर तिने चेतन यांच्याकडून त्यांची सर्व वैयक्तिक माहीतीही मिळवली. दि. १५ एप्रिल २०२५ रोजी राशीसिंग हिने चेतन यांना फोन करून तातडीने दोन लाख रूपयांची मागणी केली. चेतन लोखंडे यांनी पैसे देण्यास नकार देताच राशीने आपले एकत्र फिरतांनाचे फोटो असून ते मी तुझी व पत्नी व वडीलांना पाठवेल अशी धमकी दिली. बदनामीच्या भितीने चेतन यांनी मित्राच्या मदतीने राशीच्या आयसीआसीआय बँक खात्यावर २ लाख रूपये वर्ग केले. त्यानंतर वेगवेगळ्या खात्यावर ७ ते ८ लाख रूपये ऑनलाईन मागवले. सप्टेंबर २०२५ सोन्याच्या चैनसाठी राशीने २ लाख ४७ हजार ५०३ रूपये पुन्हा खात्यावर भरून घेतले. फेब्रुवारी २०२६ मध्ये तिने पुन्हा ६ लाख रूपयांची मागणी केली. भितीपोटी चेतन लोखंडे हे स्वतः पाच लाखाची रोकड घेवून ठाणे येथील घोडबंदर रोडवरील हार्मोनी अर्पाटमेंटमध्ये तिच्या घरी गेले. आणि राशीच्या सांगण्यावरून तिच्या बहिणीकडे ही रोकड सोपवली. पैशाची सातत्याने होणाऱ्या मागणीला चेतन लोखंडे वैतागले आणि त्यांनी ही बाब घरच्यांना कळाल्यानंतर पोलिसात तक्रार करण्यात आली.

## कडवंची येथे जिल्हाधिकाऱ्यांचा मुक्कामी दौरा ;संपूर्ण शासकीय योजनेची केली पाहणी

जालना। प्रतिनिधी

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दि. २७ मे रोजी जालना तालुक्यातील कडवंची गावात मुक्कामी दौरा करून ग्रामस्थांशी थेट संवाद साधला. ग्रामीण भागातील प्रशासनाची कामकाज पद्धती, विविध शासकीय योजनांची अंमलबजावणी तसेच गावाच्या विकासाचा प्रत्यक्ष आढावा घेत त्यांनी लोकाभिमुख प्रशासनाचा अनुभव गावकऱ्यांना दिला. जिल्हाधिकारी या रात्री सुमारे दहा वाजता कडवंची गावात दाखल झाल्या. यावेळी प्रगतशील शेतकरी कृष्णा क्षिरसागर यांनी त्यांचे स्वागत केले. त्यानंतर त्यांनी गावातील शेतकऱ्यांशी संवाद साधत कडवंची गावाचा द्राक्ष शेतीमुळे झालेला विकास,



शेतकऱ्यांची प्रगती आणि यशोगाथा जाणून घेतली. द्राक्ष पिकाच्या माध्यमातून गावाने आर्थिकदृष्ट्या केलेली भरारी ऐकून त्यांनी समाधान व्यक्त केले. पुढील काळात अधिक प्रगती साधण्यासाठी द्राक्ष पिकावर आधारित प्रक्रिया उद्योग, पूरक व्यवसाय आणि मूल्यवर्धित उपक्रम सुरू करण्याबाबतही त्यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.पहाटे सहा वाजता उठून जिल्हाधिकारी यांनी ग्रामीण भागातील पहाटेची दिनचर्या अनुभवली. गावातील कृषी सेवा केंद्राला भेट देऊन विविध फवारणी औषधे, खते आणि कृषी साहित्याची माहिती घेतली. शेतकऱ्यांना योग्य दरात व गुणवत्तापूर्ण साहित्य उपलब्ध होते का, याचीही त्यांनी चौकशी केली.त्यानंतर त्यांनी महा-ई-सेवा केंद्राला भेट देऊन नागरिकांना विविध दाखले व प्रमाणपत्रे वेळेत आणि रास्त दरात मिळतात का, याची माहिती ग्रामस्थांकडून घेतली. स्वस्त धान्य दुकानात जाऊन लाभार्थ्यांना नियमित व पुरेसे धान्य मिळते का, याची खातरजमा सामान्य नागरिकांशी थेट संवाद साधून केली.ग्रामपंचायत कार्यालयाच्या भेटीदरम्यान त्यांनी ग्रामपंचायतीच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले. गावाने उत्कृष्ट ग्रामपंचायत पुरस्कारासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. तसेच अंगणवाडी केंद्राला भेट देऊन तेथील शिजवलेल्या अन्नाची प्रत्यक्ष चव घेऊन गुणवत्ता तपासली. खिचडीची गुणवत्ता समाधानकारक असल्याचे त्यांनी नमूद केले. सध्या गावात सुरू असलेल्या जनगणनेच्या कामाचाही त्यांनी आढावा घेतला. प्रगणकांसोबत घरगणनेच्या प्रक्रियेची तपासणी करून कामकाजाबाबत सूचना दिल्या. यावेळी उपविभागीय अधिकारी श्री. दौंड, तहसीलदार छाया पवार आदींची उपस्थिती होती.

## बारमधील काम करणाऱ्या महिलेकडून अभियंताला धमकी देऊन१२ लाखाचा गंडा

जालना। प्रतिनिधी

एकत्रित काढलेले फोटो पत्नी आणि वडिलांना पाठवुन समाज माध्यमावर बदनामी करण्याची धमकी देवून मुंबई येथे एका बारमध्ये काम करणाऱ्या महिलेने जालन्यातील अभियंत्याला चक्क १२ लाखाचा गंडा घातला आहे. याबाबत थोडक्यात माहीती अशी की, चेतन संतोष लोखंडे (३४) हे व्यवसायाने स्थापत्य अभियंता असून त्यांचे नेहमीच मुंबई येथे व्यवसायाच्या निमित्ताने जाणे येणे असते. दिड वर्षापासून वाशी येथील सेंटर पॉईंट बारमध्ये त्यांची ओळख राशीसिंग उर्फ अर्चना मनोजसिंग या ३५ वर्षीय महिलेसोबत झाली. त्यावेळी दोघांनी एकमेएकाचे मोबाईल नंबर घेवून संपर्क वाढवला. सदरील महिलेने चेतन लोखंडे यांना मॅसेज आणि फोन कॉल करून मैत्री घट्ट केली. त्यानंतर तिने चेतन यांच्याकडून त्यांची सर्व वैयक्तिक माहीतीही मिळवली. दि. १५ एप्रिल २०२५ रोजी राशीसिंग हिने चेतन यांना फोन करून तातडीने दोन लाख रूपयांची मागणी केली. चेतन लोखंडे यांनी पैसे देण्यास नकार देताच राशीने आपले एकत्र फिरतांनाचे फोटो असून ते मी तुझी व पत्नी व वडीलांना पाठवेल अशी धमकी दिली. बदनामीच्या भितीने चेतन यांनी मित्राच्या मदतीने राशीच्या आयसीआसीआय बँक खात्यावर २ लाख रूपये वर्ग केले. त्यानंतर वेगवेगळ्या खात्यावर ७ ते ८ लाख रूपये ऑनलाईन मागवले. सप्टेंबर २०२५ सोन्याच्या चैनसाठी राशीने २ लाख ४७ हजार ५०३ रूपये पुन्हा खात्यावर भरून घेतले. फेब्रुवारी २०२६ मध्ये तिने पुन्हा ६ लाख रूपयांची मागणी केली. भितीपोटी चेतन लोखंडे हे स्वतः पाच लाखाची रोकड घेवून ठाणे येथील घोडबंदर रोडवरील हार्मोनी अर्पाटमेंटमध्ये तिच्या घरी गेले. आणि राशीच्या सांगण्यावरून तिच्या बहिणीकडे ही रोकड सोपवली. पैशाची सातत्याने होणाऱ्या मागणीला चेतन लोखंडे वैतागले आणि त्यांनी ही बाब घरच्यांना कळाल्यानंतर पोलिसात तक्रार करण्यात आली.

## गोमातेला राष्ट्रीय पशुचा दर्जा देण्याची हिंदू- मुस्लिम बांधवांची आदर्श मागणी

पाथर्डी । प्रतिनिधी

गोमातेला शासनाने राष्ट्रीय पशु चा दर्जा देऊन गोहत्या बंदी कायदा अमलात आणावा गाय विकणारे विकत घेणारे वाहतूक करणारे अशा सर्वच घटकांवर कारवाई व्हावी अशा संदर्भाचा ठराव तालुक्यातील मुस्लिम बांधवांनी केला या निर्णयाचे सर्व धर्मीय नागरिकांकडून जोरदार स्वागत झाले प्रांतअधिकारी प्रसाद मते तहसीलदार डॉ.उद्धव नाईक पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांना निवेदन देण्यात आले या शिष्टमंडळामध्ये काँग्रेसचे तालुकाध्यक्ष नासिर शेख जुनेद पठाण सामाजिक कार्यकर्ते शनो पठाण मुन्ना खलिफा एजाज शेख आरिफ कुरेशी समीर शेख असिफ शेख इष्टियाक चौधरी उस्मान शेख मोहम्मद पटेल अजीज शेख सुनील दौंड सरफराज चौधरी आनंद सानप अमजद आतार वसीम मणियार जावेद पिंजारी अकबर शेख सादिक सय्यद आदींनी निवेदन दिले .

यावेळी माहिती देताना नासिर शेख म्हणाले गोमाता म्हणजे गाय सर्व जाती धर्माच्या नागरिकांचे श्रद्धेचे स्थान आहे गाईला राष्ट्रीय पशुचा दर्जा दावा यासाठी आम्ही गेल्या अनेक दिवसांपासून या संदर्भात मागणी करत आहोत सर्व भारतीयांना गाई विषयी आदर वाटतो केंद्राने याबाबतचा कायदाच करण्याची गरज आहे संदर्भात निष्पाप नागरिकांवर दाखल होणारे खोटे गुन्हे सुद्धा दाखल करू नये निरपराध लोकांना त्रास होत असेल तर याचा परिणाम



तणाव वाढण्यात होतो गाय विकणारे खरेदी करणारे वाहतूक करणारे असे सर्वच जण कारवाईला पात्र ठरले पाहिजेत सामाजिक शांतता जातीय सलोखा भंग पावणार नाही याचीही दक्षता प्रशासनाने घेतली पाहिजे या गैरकृत्याला केवळ एका समाजाला जबाबदार धरून चालणार नाही सामाजिक शांतता व जातीय सलोखा टिकून ठेवण्यासाठी मुस्लिम समाज नेहमीच सकारात्मक राहिला आहे देश सध्या वेगळ्या संकटातून जात आहे शासन प्रशासन प्रचंड तणावग्रस्त मनस्थितीत वावरत आहे देशातील जनता सुद्धा मोठ्या प्रमाणावर संकटात आहे अशावेळी जातिवाद धर्मवाद व त्यावरून होणारी भांडणे सामाजिक स्थैर्याच्या दृष्टीने परवडणारी नाहीत गोहत्या संदर्भात संदर्भात एकाच समाजाकडे संशयाने बघणे चुकीचे आहे सर्व राष्ट्राचीच पवित्र माता म्हणून गोमातेकडे संपूर्ण देश बघतो त्यामुळे राष्ट्रीय पशुचा दर्जा द्या दोषींवर कारवाई करताना निरपराध व्यक्तीला अशा प्रकरणांमध्ये ओढू नका अशी मागणी मुस्लिम बांधवांनी केल्याची माहिती नाशिर शेख यांनी दिली.

## जायकवाडी धरणातील हक्काच्या पाण्यासाठी बैलगाडी मोर्चात सहभागी व्हा :कुलदीप करपे

बीड। प्रतिनिधी

ायकवाडी धरणातील मराठवाड्यासह बीड जिल्ह्याच्या हक्काच्या पाण्यासाठी लोकल आंदोलनाच्या वतीने शुक्रवार दि.२९ रोजी जिल्हा स्टेडियम ते जिल्हाधिकारी कार्यालय असा बैलगाडी मोर्चा काढण्यात येणार असून, या मोर्चात शेतकरी, शेतकरी पुत्र तसेच शेतकऱ्यांविषयी संवेदना असलेल्या नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांनी केले आहे.

बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना वारंवार आस्मानी आणि सुलतानी संकटांचा सामना करावा लागत आहे. मराठवाड्याच्या हक्काचे कृष्णा खोऱ्यातील २५ टीएमसी पाणी देण्यास पश्चिम महाराष्ट्रातील नेते टाळाटाळ करत आहेत. मराठवाडा, विशेषतः बीड जिल्हा, सिंचनाच्या मोठ्या अनुशेषाला सामोरे जात आहे. कोकणातील १६८ टीएमसी अतिरिक्त पाणी नदीजोड प्रकल्पातून मराठवाड्याकडे वळविण्याचे नियोजन असून, हे काम नियोजित वेळेत पूर्ण करून बीड जिल्ह्यातील शेतीला पाणी मिळावे, अशी मागणीही कुलदीप करपे यांनी केली. तसेच गोदावरी सिंदफणा नदीजोड प्रकल्प तातडीने राबवून त्यासाठी सर्व्हे करण्यात यावा, अशीही मागणी त्यांनी केली आहे.



यासोबतच कोकणातून येणाऱ्या १६८ टीएमसी पाण्यातून बीड जिल्ह्याला किती पाणी देता येईल, याचा स्वतंत्र सर्व्हे करावा. गेवराई तालुक्यातून जाणारा उजवा कालवा आणि माजलगाव धरणातून जायकवाडी धरणाला मिळणारे पाणी पूर्ववत करण्यात यावे, अशा मागण्याही त्यांनी मांडल्या. या सर्व मागण्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या बैलगाडी मोर्चात जिल्ह्यातील शेतकरी व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन कुलदीप करपे यांनी केले आहे.

## महिला उद्योजकांसाठी प्रशिक्षण व कर्ज अनुदान करिता प्रमाण पत्र देणार-हस्तीमल बंब

जालना । प्रतिनिधी

व्यापारी महासंघ व जनरल मर्चन्ट जिल्हा जालनाच्या महिला-पुरुष प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक जिल्हाध्यक्ष हस्तीमल बंब यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली. त्यावेळी बोलतांना बंब म्हणाले येत्या ३१ मे २०२६ रविवार रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वा पर्यंत एक दिवसीय महिला आणि / साठी क्षमता निर्माण प्रशिक्षण व व्यवसाय वित्त नियोजन कार्यशाळा जैन भवन, सकलेचा नगर, भोकरदन रोड, जालना येथे प्रथमच आयोजित करण्यात आली आहे. सुक्षम, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्रातील उद्योजकांना सक्षम करण्याच्या उद्देश्याने हा प्रशिक्षण होत आहे. या कार्यक्रमा मध्ये विविध शासकीय योजना, अनुदान कर्ज या बद्दल सखोळ मार्गदर्शन वर उद्योजक व्यवसाय संधी तसेच - आणि व्यवसाय विस्ताराच्या विषयावर सविस्तर




माहिती देण्यात येईल. या कार्यक्रमात उद्योग मंत्रालय, महाराष्ट्र शासना तर्फे श्रीमती पोर्णिमा शिरीषकर शासकीय योजनाच्या सविस्तर मार्गदर्शन करतील. या एक दिवसीय कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी असणे आवश्यक आहे. मागील महिण्यात लहान-सहान गरजु महिला उद्योजकांसाठी जिल्हा महिला अधिवेशन आयोजित करण्यात आले होते. जिल्ह्यातील मोठ्या संख्येने महिला मार्फत उद्योग, गृह-उद्योग व्यवसायासाठी अनुदान कर्ज प्रस्ताव दाखल करण्यात आले होते. उद्यम व प्रमाण पत्र मिळाल्यानंतर जिल्हा ग्रामउद्योग आणि अग्रणीय बँका कडे प्रस्ताव मंजुरीसाठी सोपे होईल. या शिबिरात अग्रणीय बँकेचे मंगेश केदार सुध्दा उपस्थित राहतील अशी माहिती बंब यांनी दिली. महिला आघाडीची सौ. सिता मोहिते, सौ. आंनदी अय्यर, सौ. प्रिया जोशी यांनी जिल्ह्यातील सर्व तालुका अंतर्गत ग्रामिण भागातील महिला शाखांना संपर्क करुन जास्तीत-जास्त महिला उपस्थित राहतील यासाठी सर्वपरी प्रयत्न करु असे सांगितले. श्री सुखदेव बजाज, सतिष पंच यांनी आपले विचार मांडले. या बैठकीत माहिती पत्रक वितरण करण्यात आले. जालना शहरातील व ग्रामीण भागातील गरजु महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहुन मार्गदर्शनाचा व शासकीय योजनांचा अनुदान व कर्ज बद्दल लाभ घ्यावा, उद्यम आधार असलेले सर्व महिलांना या शिबिरात महाराष्ट्र शासनाचे प्रमाणपत्र देण्यात येईल असे बंब म्हणाले. या बैठकीचे सुत्र संचालन व आभार सचिव प्रविण मोहता यांनी केले.

दैनिक
राज्य लोकतंत्र
शुक्रवार दि.२९ मे २०२६


# जायकवाडीच्या पाण्यासाठी आज महाएल्गार

## पाटाच्या पाण्याशिवाय शेतकऱ्यांच्या मुलांचे भविष्य उज्वल होणार नाही

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील बहुतांश शेतीला जायकवाडी धरण व कृष्णा खोर्याचे पाणी मिळत नसल्याने शेती व शेतकरी सातत्याने संकटात आहे. शेती व शेतकऱ्यांची ही परिस्थिती बदलायची असेल तर आपल्या शेतीला जायकवाडी धरणाचे हक्काचे पाणी मिळाले पाहिजे, या पाण्याशिवाय शेतकऱ्यांच्या मुलांचे भविष्य उज्वल होणार नाही, शेतीला हक्काचे पाणी मिळावे यासाठी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर आज शुक्रवारी होणाऱ्या महाएल्गार बैलगाडी मोर्चात तरुण, शेतकरी यांनी मोठ्या संख्येने



सहभागी व्हावे असे आवाहन लोकलढा आंदोलनाच्या समन्वयकांनी केले. ते, गेवराई तालुक्यातील तरटेवाडी व दिमाखवाडी येथे बोलत होते.

बीड जिल्ह्यातील बहुतांश भागातील शेतीला जायकवाडी धरणाचे हक्काचे व जीवंत पाणी मिळत नाही. त्यामुळे बीड जिल्ह्यातील शेतकरी सातत्याने दुष्काळात पिचला जातो. फळबाग, ऊस, भाजीपाला असे पीक घतल्यानंतर पाऊस कमी झाल्यास पीके जळून जातात, ऐनवेळी विहिरी, बोअर यांचे पाणी कमी होत असल्याने बारमाही बागाईत शेती अडचणीत येते. यामुळे बीड जिल्ह्यातील शेतकरी सातत्याने संकटात आहेत. यातुनच शेतकरी आत्महत्या, शेतकरी कर्जबाजारीपणा, शेतकऱ्यांच्या मुलांचे शिक्षण, आरोग्य, ऊसतोड कामगारांच्या समस्या, रोजगारासाठी स्थलांतर असे अनेक प्रश्न समोर येतात. हे प्रश्न सोडविण्यासाठी व शेतकर्यांच्या मुलांचे भविष्य उज्वल करण्यासाठी आपल्या शेतीला हक्काचे जायकवाडी धरणाचे पाणी मिळावे, अशी भूमिका लोकलढा आंदोलनाच्या समन्वयकांनी मांडली. या मागणीसाठी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर बैलगाडी मोर्चा काढण्यात येणार आहे, या मोर्चामध्ये शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आववाहनही लोकलढा आंदोलनाच्या वतीने करण्यात आले आहे.

### पुन्हा पन्नास वर्षे पाणी मिळणार नाही

गेवराई तालुक्यातील चकलांबा, तांदळा, मातोरी, कोळगाव, मादळमोही, सिरसमार्ग, पाडळसिंगी, पाचेगाव ते तालखेडपर्यंतच्या शिवाराच्या पाच ते वीस किमी अंतरावरुन जायकवाडी धरणाचा उजवा कालवा गेला आहे. गेल्या पन्नास वर्षांत श्री क्षेत्र भगवान गड ते माजलगाव पर्यंतच्या शेतीला जायकवाडी धरणाचे पाणी मिळाले नाही. आता शासन १६८ टीएमसी पाण्याचे नियोजन करीत आहे. या पाण्यातही वंचित भागाला हक्काचे पाणी मिळाले नाही तर पुन्हा पन्नास वर्षे आपल्या शेतीला हक्काचे पाणी मिळणार नाही, अशी खंतही यावेळी लोकलढा समन्वयकांनी व्यक्त केली.

### शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे

शेतीला हक्काचे पाणी मिळावे यासाठी लोकलढा आंदोलनच्या वतीने गेल्या दोन वर्षांपासून सतत लोकशाही मार्गाने संघर्ष सुरू आहे. गोदावरी-सिंदफणा नदीजोड प्रकल्प गतीने व्हावा, यासाठी सर्वे करावा आदी मागण्यांसाठी आज बैलगाडी मोर्चाचे आयोजन केले आहे. या शेतकरी, शेतकरी पुत्रांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन लोकलढा आंदोलनाच्या वतीने करण्यात आले आहे.



बीड : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे बीड जिल्हा अध्यक्ष उल्हास गिराम यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना दैनिक राज्य लोकतंत्रचे कार्यकारी संपादक सुभाष चौरे, उपसंपादक अनिल जाधव,विशाल साळुंखे ,जाहिरात वितरण प्रमुख दिलीप शिंगाडे ,सोबत शिवसेनेचे जिल्हा उपाध्यक्ष भाई संजय महाद्वार

# बीडमध्ये शिवाजीनगर पोलिसांचे दिवसभर धाडसत्र; जुगार अड्डे आणि दारूचा मोठा साठा जप्त, लाखांचा मुद्देमाल हस्तगत

बीड । प्रतिनिधी

बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर शहरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आणि अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी शिवाजीनगर पोलिसांनी २७ मे २०२६ रोजी दिवसभर धडक मोहीम राबवली. या कारवाईत पोलिसांनी ४ मटका व जुगार अड्ड्यांवर छापे टाकले, तर एका ठिकाणी अवैध दारूविक्रीचा मोठा डाव उधळून लावला. या सर्व कारवायांमध्ये एकूण ५ आरोपींना रंगेहात अटक करण्यात आली असून, एकूण ३,२१,१२०/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



'ड्राय डे' चा फायदा घेण्याचा दारू माफियाचा डाव उधळला

बकरी ईदनिमित्त शासकीय 'ड्राय डे' (दारूबंदी) असल्याचा फायदा घेऊन, इंदिरा नगर परिसरामध्ये चढ्या दराने दारू विकण्याचा कट रचला गेला होता. मात्र, पोलिसांना याची गोपनीय माहिती मिळताच त्यांनी रात्री २२:५० वाजता नाट्यगृहाजवळ, इंदिरा नगर भागातील एका मोकळ्या पत्र्याच्या शेडवर अचानक छापा टाकला.

या कारवाईत आकाश सदाशिव वडमारे (रा. इंदिरा नगर, बीड) या आरोपीला अटक करण्यात आली. त्याच्याकडून 'बॉबी संत्रा' आणि 'टँगो पंच' कंपनीचे एकूण १२ बॉक्स (१,२०० प्लास्टिक दारूच्या बाटल्या) जप्त करण्यात आल्या. आरोपीविरुद्ध कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मटका आणि ऑनलाईन जुगार अड्ड्यांवर पोलिसांची नजर

दारूच्या साठ्यासोबतच पोलिसांनी शहरातील विविध भागांत सुरू असलेल्या जुगार अड्ड्यांवरही कारवाई केली:

नगर नाका (हॉटेल ऑलिव्हससमोर): अमिर खान नादेरखान पठाण याला मटका जुगार खेळवताना पकडले.

लाईफ लाईन हॉस्पिटल (कॅनाल रोड): शेख हुजेर शेख रियाज पान ३ वर

# अंबाजोगाई शहर घरफोडी प्रकरणातील सराईत गुन्हेगाराला स्थानिक गुन्हे शाखेने ठोकल्या बेड्या

बीड / अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या एका मोठ्या घरफोडीचा छडा लावण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे. या प्रकरणातील सराईत गुन्हेगारासह दोन विधीसंघर्ष बालकांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्याकडून १ लाख ५० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत.

अंबाजोगाई येथील रहिवासी प्रभाकर रघुनाथ मुंडे यांचे घर



दि. १३ मे ते १८ मे २०२६ दरम्यान बंद होते. या संधीचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्याने त्यांच्या बंद घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला आणि घरातील सोन्याचे दागिने चोरून नेले होते. याप्रकरणी १९ मे रोजी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा रजिस्टर नंबर १८२/२०२६, कलम ३०५, ३३१(३), (४) इछड अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्याचा समांतर तपास अंबाजोगाई शहर पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखा बीड करत होते. दि. २७ मे रोजी स्थानिक बातमीदाराकडून खात्रीशीर माहिती मिळाली की, सदरची घरफोडी अंबाजोगाई येथील सराईत गुन्हेगार शिवम जनक कसबे (रा. सैनिक कॉलनी, मोरेवाडी, ता. अंबाजोगाई) याने त्याच्या दोन साथीदारांसह पान ३ वर

# चिंचाळ्यात शॉर्टसर्किटमुळे घराला आग; शेतकऱ्याचा २० क्विंटल कापूस जळून खाक

वडवणी । प्रतिनिधी

चिंचाळा येथे बुधवारी सकाळी दहा वाजता शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या भीषण आगीत यशवंत कुलकर्णी या शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले असून सुमारे २० क्विंटल कापूस जळून खाक झाला. तसेच घरातील संसारोपयोगी साहित्यही आगीत भस्मसात झाले. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित शेतकऱ्याने आपल्या घरातील दोन खोल्यांमध्ये कापूस साठवून ठेवला होता. अचानक विद्युत शॉर्टसर्किट झाल्याने घराला आग लागली. काही क्षणांतच आगीने रौद्र रूप धारण करत एका खोलीतील



संपूर्ण कापसाला वेढले. यात सुमारे २० क्विंटल कापूस पूर्णपणे जळून खाक झाला. आग लागल्याचे लक्षात येताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेत आग विझविण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, दुसऱ्या खोलीतील कापूस ग्रामस्थ व शेतकऱ्यांनी तत्परता दाखवत बाहेर काढला. त्यामुळे दुसऱ्या खोलीतील कापूस वाचविण्यात यश आले. या आगीत घरातील फर्निचर, कपडे, धान्य तसेच इतर संसारोपयोगी साहित्याचेही मोठे नुकसान झाले आहे. अचानक झालेल्या या घटनेमुळे शेतकरी कुटुंबावर आर्थिक संकट ओढवले असून प्रशासनाने पंचनामा करून तातडीने मदत द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# पात्रुडमध्ये बकरी ईद उत्साहात साजरी सामाजिक ऐक्य व बंधुभावाचे पुन्हा दर्शन



माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील पात्रुड गावाने सामाजिक ऐक्य, बंधुभाव आणि परंपरेचा सुंदर वारसा कायम जपला असून बकरी ईदच्या निमित्ताने पुन्हा एकदा गावातील एकोप्याचे दर्शन घडले. पात्रुड येथील ईदगाह परिसरात हजारो मुस्लिम बांधवांनी मोठ्या उत्साहात आणि धार्मिक वातावरणात ईदची नमाज अदा केली.

विशेष म्हणजे, पात्रुड गावात सर्व धर्मीय नागरिक प्रत्येक सण एकोप्याने आणि आनंदात साजरा करत असल्याची परंपरा कायम आहे. याच सामाजिक सलोख्याचे दर्शन यावेळीही ईदच्या उत्सवात पाहायला मिळाले. नमाज पठणानंतर ईदगाह परिसरात मुस्लिम बांधवांना शुभेच्छा पान ३ वर

# बीड जिल्ह्यात बकरी ईद उत्साहात साजरी





बीड । प्रतिनिधी

बकरी ईद निमित्त बीड शहरासह जिल्हाभरात मुस्लिम बांधवांनी मोठ्या उत्साहात आणि धार्मिक वातावरणात नमाज पठण करून ईद साजरी केली. सकाळपासूनच विविध ईदगाह व मशिदींमध्ये मुस्लिम बांधवांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. शांतता, बंधुता आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देत नागरिकांनी एकमेकांना ईदच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी बीड शहरातील नमाज पठण कार्यक्रमाला आमदार संदीप क्षीरसागर यांनी भेट देत मुस्लिम बांधवांना बकरी ईदच्या शुभेच्छा दिल्या. ''ईदचा सण समाजात प्रेम, सौहार्द आणि एकोप्याची भावना दृढ करणारा आहे. सर्वांनी एकत्र येत सामाजिक ऐक्य कायम ठेवावे. बीड जिल्ह्यात विविध ठिकाणी प्रशासनाकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. नागरिकांनीही शांततेत आणि आनंदात सण साजरा करत सामाजिक सलोखा जपल्याचे चित्र सर्वत्र पाहायला मिळाले.

# सामान्य माणसाचे हित डोळ्यासमोर ठेवूनच केंद्र व राज्य सरकार विकासाच्या योजना यशस्वीपणे राबवत आहे – ना. पंकजाताई मुंडे

## बीड जिल्हा भाजपच्या प्रशिक्षण वर्गाचा थाटात समारोप, मोदी, फडणवीस सारखे कुशल नेते लाभल्याने पक्षाला मोठे यश मिळाले

मुंबई । प्रतिनिधी

गरीब व गरिबीची जाण असणारे पंतप्रधान आपल्या देशाला लाभले आहेत आणि याचमुळे केंद्र व राज्य सरकार सामान्य माणसाला समोर ठेवून आज विकासाच्या अनेक योजना यशस्वीपणे राबवित आहे. समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत विकासाचे लाभ पोहोचले पाहिजेत यासाठी त्यांचे प्रयत्न आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी व राज्यात देवेंद्र फडणवीस सारखे कुशल नेते लाभले असल्यामुळे पक्षाला फार मोठे यश मिळाले आहे अशा शब्दांत राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी आज पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला.



पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान अंतर्गत बीड जिल्हा भाजपच्या दोन दिवसीय प्रशिक्षण वर्गाचा समारोप आज रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला, समारोपाच्या शेवटच्या सत्रात केंद्र आणि राज्य सरकारच्या जन कल्याणकारी योजना या विषयावर पदाधिकाऱ्यांशी संवाद साधताना त्या बोलत होत्या.केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकार सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, महिला आणि तरूणांच्या हिताच्या अनेक योजना यशस्वीपणे राबवित असल्याचे सांगत विविध कल्याणकारी योजनांचा लेखाजोखा आपल्या भाषणात मांडला. पुढे बोलतांना त्या म्हणाल्या, मी लहानपणापासूनच भाजपच्या संस्कारात वाढले. माझ्या नावातच भाजपचे कमळ आहे. लोकनेते मुंडे साहेबांमुळे अटलजी, आडवाणीजी सारख्या नेत्यांना जवळून अनुभवता आले. मुंडे साहेब मला सगळीकडे घेऊन जायचे, त्यांनी पक्षाला वाडी, वस्ती, तांड्यापर्यंत घेऊन जाण्यासाठी जे कष्ट घेतले त्यामुळे आज चांगले दिवस आपण पहात आहोत. मुंडे साहेबांनी जे स्वप्न पाहिले होते, त्या स्वप्नांना सरकारी योजनांच्या स्वरूपात मी आणले. हे काम माझ्या एकट्याचे नव्हते तर पक्ष आणि नेतृत्व माझ्या मागे उभे असल्याने हे शक्य झाले. जलयुक्त शिवार, मुख्यमंत्री ग्रामसडक, बचतगटांना शुन्य टक्के दराने कर्ज अशा कितीतरी योजना चांगल्या रितीने राबवू शकले.

### ताईंनी घेतली पदाधिकाऱ्यांची काळजी

प्रशिक्षण वर्गास दोन्ही दिवशी ना. पंकजाताई मुंडे व डॉ.प्रितमताई मुंडे पूर्णवेळ उपस्थित होत्या, त्यामुळे पदाधिकाऱ्यांमध्ये मोठा उत्साह होता. शिबीरात सर्वांची चहा, नाश्ता, निवास, भोजनाची व्यवस्था योग्य झाली की नाही, याची त्यांनी स्वत: आस्थेवाईकपणे प्रत्येकाला बोलून चौकशी केली. त्यांच्यासमवेतच नाश्ता, भोजन केले. सत्राचा समारोप झाल्यानंतर सर्व सुखरूप पोहोचा, सावकाश जा असा काळजीचा सल्लाही दिला.आ. नमिता मुंदडा, माजी आमदार बदामराव पंडित, प्रवक्ते नवनाथ बन, राम कुलकर्णी, बाळदादा पवार, जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, नवनाथ शिराळे, माधव निर्मळ, संतोष हंगे, विजय गोल्हार यांसह जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी याप्रसंगी उपस्थित होते.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26